दैनिक
# सिंधुदुर्ग समाचार
ग्रामीण जनतेचे एकमेव लोकप्रिय मराठी दैनिक
सिंधुदुर्ग-मुंबई
www. sindhudurgsamachar. in
T-2/RNP/SDG-06/2019-2021
संस्थापक : प्राचार्य मुकुंदराव कदम
रविवार पुरवणी २६ जानेवारी २०२५



# प्रजासत्ताक भारत



बाबू घाडीगांवकर,
त्रिंबक, ता.मालवण.
मो. ९४२१७९९९५५.

१५ ऑगस्ट १९४७ रोजी आपला भारत देश ब्रिटीश राजवटीच्या जोखडातून मुक्त झाला. आपला देश स्वतंत्र झाला. आपल्या देशाला स्वातंत्र्य मिळाले. अर्थातच आपल्या देशास हे स्वातंत्र्य काही सहजासहजी मिळाले नाही. त्यासाठी अनेक वर्षांचा लढा द्यावा लागला. अनेक ज्ञात अज्ञात स्वातंत्र्य वीरांना आपल्या प्राणांची आहुती द्यावी लागली. सर्व सामान्य जनतेला अपरिमित जुलूम, अत्याचारांचा सामना करावा लागला. आपला देश ब्रिटीश राजवटीपासून मुक्त झाला तरी लॉर्ड माऊंटबॅटनच्या रुपात ब्रिटीश शासक येथे होताच. याशिवाय पाकिस्तानातून भारतात येणारे प्रचंड लोंढे थांबत नव्हते. या लाखो लोकांची काय आणि कशी व्यवस्था करायची हे स्वतंत्र राष्ट्रासमोरील प्रमुख आव्हान होते.

भारतातील अनेक संस्थानिकांनी स्वतंत्र भारतात विलीन होण्याची तयारी दर्शविली तरी हैदराबाद, जुनागढ, काश्मिरचे संस्थानिक भारतात सामील होण्यास राजी नव्हते. सुमारे अडीचशे वर्षांच्या राजवटीत ब्रिटिशांनी भारताची अपरिमित लूट केली होती. लोकांना दोन वेळेस अन्न मिळेल याची खात्री नव्हती. संपूर्ण देशभरातील केवळ वीस टक्के शेतजमिनीत लागवड, शेती पिकत होती. स्वतंत्र देशाचा कारभार करावयाचा तर देशात लिखित घटना नव्हती. कायदेसंहिता अस्तित्वात नव्हती. ब्रिटीश राजवटीतील सन १९३५ सालापासून प्रचलीत असलेल्या कायद्यांच्या व नियमांच्या आधारावर आपल्या देशाचा कारभार सुरु झाला होता.

भारतासारख्या खंडप्राय देशाचा कारभार करायचा म्हणजे या देशाचे निश्चित कायदे हवेत, नियम हवेत, देशाची स्वतःची राज्यघटना हवी असा विचार पुढे आल्यावर देशासाठीच्या संविधानासाठीची चर्चा सुरु झाली. २९ ऑगस्ट १९४७ रोजी याबाबत एकमत झाले आणि देशाचे संविधान निर्माण करण्यासाठीची मसुदा समिती स्थापन करण्यात आली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे या समितीचे अध्यक्ष होते. या समितीने तयार केलेला संविधानाचा मसुदा ४ नोव्हेंबर १९४७ रोजी सादर करण्यात आला. पुढच्या १६६ दिवसांसाठी हा संविधानाचा मसुदा सर्व सामान्य जनतेसाठी खुला करण्यात आला. या मसुद्यावर विविधांगी चर्चा झाली. जनतेची मते विचारात घेण्यात आली. अनेक वेळा या मसुद्यात सुधारणा व दुरुस्ती करण्यात आली. भारतीय संविधान तयार करण्याचे काम भारतीय संविधान सभेने केले. भारताचे पहिले राष्ट्रपती असलेले डॉ. राजेंद्रप्रसाद हे या संविधान सभेचे अध्यक्ष होते. मसुद्यातील विविध मुद्द्यांवर चर्चा, दुरुस्ती होऊन अखेर दि. २६ नोव्हेंबर १९४९ रोजी भारताचे संविधान स्वीकृत करण्यात आले.

पं. जवाहरलाल नेहरु यांनी ३१ डिसेंबर १९२९ रोजी लाहोर जवळील रावी नदीच्या काठावर अशोक चक्रांकीत तिरंगा



फडकवून भारतीय स्वातंत्र्याची, प्रजासत्ताकाची घोषणा केली होती. या घटनेची आठवण म्हणून २६ जानेवारी १९५० हा दिवस प्रजासत्ताक व सार्वभौम दिन म्हणून निश्चित करण्यात आला. याच दिवसापासून स्वतंत्र भारताचा कारभार संविधानानुसार सुरु करण्याचा निर्णय घेण्यात आला.

भारतीय संविधान लागू झाल्याला आज पंच्याहत्तर वर्षे पूर्ण झाली आहेत. "**आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम....**" ही संविधानाची प्रस्तावना दररोज शाळेत ऐकावयास मिळते. असे शब्द कानावर पडले की आपण भारतीय असल्याचा, आपण सार्वभौम असल्याचा अभिमान वाटतो. नकळत आपल्या भारतीय संविधानाविषयीचा आदर अधिक वृद्धिंगत होतो. या प्रस्तावनेस संविधानाचा सरनामा किंवा संविधानाची उद्देशिका असेही म्हणतात.

भारतीय संविधानातील सर्व प्रमुख तत्वांचा या उद्देशिकेत उल्लेख केला गेला आहे. प्रजासत्ताक याचा अर्थच मुळी प्रजेची म्हणजेच जनतेची सत्ता असा आहे. लोकांनी लोकांसाठी चालविलेले लोकांचे राज्य असा त्याचा अर्थ आहे. न्याय, समता, बंधुता, एकता आणि एकात्मता ही भारतीय संविधानाची प्रमुख उद्दिष्टे आहेत, तर सार्वभौम, समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य हे स्वतंत्र भारतातील राजकीय व्यवस्थेचे स्वरुप निश्चित करण्यात आले आहे. स्वतंत्र भारताचा कारभार करताना येथील राजकीय व्यवस्थेला शून्यापासूनच सुरुवात करावी लागली असे म्हटले तर चुकीचे ठरणार नाही. कारण ब्रिटीशांनी या देशाच्या संपत्तीची लयलूट केली होती. येथील शेती, उद्योग देशोधडीला लागले होते. देशातील गरीबीची समस्या अतिशय गंभीर होती. येथील आरोग्य व्यवस्था अंथरुणाला खिळली होती. देशात निरक्षरता, अंधश्रद्धा बोकाळली, फोफावली होती. भारतातील पारंपारिक शेतीची अवस्था तर फारच बिकट होती.

गेल्या पंच्याहत्तर वर्षांपासून केलेले आर्थिक, कृषी, उद्योग, तंत्रज्ञान, शिक्षण आदी क्षेत्रातील नियोजन, अंमलबजावणी, पंचवार्षिक योजनांच्या आधारे आश्वासक प्रगती साधीत भारत आज एक बलशाली सार्वभौम राष्ट्र बनले आहे. मात्र आज इतक्या वर्षांनंतर देखील आपण जगातील विकसित राष्ट्रांच्या पंक्तीत स्थान मिळवू शकलो नाही याची आजही खंत आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, शिक्षण, उद्योग व शेतीच्या क्षेत्रात भारताने चांगली प्रगती केली असली तरी बेरोजगारी, निरक्षरता, आरोग्य, शिक्षण, महागाई यांसारख्या अनेक समस्या व आव्हाने आजही आहेत.

आज सार्वभौम राष्ट्राच्या पंच्याहत्तरीनंतरही देशाचा पोशिंदा व कणा असलेला शेतकरी आर्थिक दृष्ट्या स्थिर व भक्कम नाही. मात्र असे असले तरी विज्ञान, तंत्रज्ञान, संशोधन, बांधकाम, उद्योग यांसारख्या विविध क्षेत्रात देशाने नेत्रदीपक कामगिरी केली आहे. आज आपण ७६ वा प्रजासत्ताक दिन साजरा करीत आहोत. यापुढील काळात आपला देश विविध क्षेत्रात चमकदार कामगिरी करो, जगातील बलाढ्य व विकसित देशांच्या पंक्तीत आपल्या देशाला स्थान लाभो!आपला प्रजासत्ताक भारत चिरायु होवो!

**'वाडा'** या पुस्तकाचे प्रथितयश लेखक **श्री. विलास कोळी** आजपासून **'गड किल्ल्यांचे स्थापत्य शास्त्र'** या सदरातून गड - किल्ल्यांचे बांधकाम याबद्दल अतिशय माहितीपूर्ण आणि अभ्यासू विवेचन देणार आहेत आजपासून हे नवीन सदर दर रविवारी आपल्या भेटीस येणार आहे.

# खापरीन आजीची पडवी

## गावाकडच्याआठवणी





भाग -७

भावेश लोंढे,
दापोली
मोबा. ९७६९३८६०९१

वाडीच्या मध्यभागी माझ्या घराच्या खालच्या बांधाखाली खापरीन आजीचं घर म्हणजे आम्हा लहान मुलांना खेळण्यासाठी हक्काचं मंच. त्या घराच्या ओटी, पडवीमध्ये खेळताना स्वर्गसुखाची अनुभूती होती. मोकळ्या अंगणात, शांत वातावरणात वसलेले खापरीन आजीचं कौलारू घर म्हणजे प्रेम, आठवणी आणि आपलेपणाचा ओलावा असलेली जागा. गावातील प्रत्येक लहान-मोठ्या माणसासाठी ती पडवी म्हणजे एक हक्काचं ठिकाण होतं.

पडवीचा साज म्हणजे मातीचा गिलावा करून बांधलेला दगडी ओटा. या ओट्यावर बसून आम्ही मुले नाना तऱ्हेचे खेळ आणि दंगा मस्ती करत असू. तेव्हा खापरीन आजी ओरडत असे, पण त्या ओरडण्यात सुद्धा मायेचा गोडवा होता. सांजवताना किलबिलणाऱ्या मुलांचा त्रागा व्हायचा, पण आजीची माया आडवी यायची अन् मुलांना मोकळं उद्यान मिळायचं. मातीच्या भिंतींनी बांधलेले घर लाकडी खांबांवर उभे होते. उन्हाच्या झळा असोत की पावसाच्या सरी, ही पडवी गावातील मंडळींचे कायमचं आसरा ठरत असे. ओल्या मातीचा सुगंध, पडवीला लागून असलेल्या चिंचेच्या झाडाची सावली, आणि आजीच्या गोड बोलण्याने ती जागा अजूनच खास वाटायची. आजीच्या डोळ्यांनी कधीही न दिसणारी पाखरांची मैफिल मात्र आजी मनानं बरोबर बघायची. कानाने ऐकून कुणाचा मुलगा दंगा करतोय .हे त्यांच्या आवाजावरून तंतोतंत ओळखायची. आजीला दिसत नव्हते तरी रापत रापत आसपासची घरे फिरून यायची. नातवांना सांभाळायची. जेवण करायची. भांडीकुंडी, कपडे धुणे, केरकचरा करायची. दृष्टी नसताना सुद्धा खापरीन आजीचा मात्र दृष्टीकोन चांगला होता.

संध्याकाळी शाळा सुटल्यावर आम्ही पोर मंडळी अभ्यास करायला तसेच हुंदडायला तिथे जमायचो. सुट्टीच्या दिवशी तर तिथे पोरांचा गलबला असायचा. अंगणात असणारा विजेचा पोल हा डबाई स्प्रेस (लपाछपी) खेळताना शिवण्याचा मुख्य भाग असायचा. त्या पोलाला पकडुन गरगर गिरकी घेत असायचो आणिहात सोडले की तोल जाऊन अंगणात पडायचो. गोल फिरताना झिंग यायची. त्यामुळे आपोआप तोल जायचा. त्याच प्रमाणे बॉक्स अंडर आर्म क्रिकेट खेळताना आऊट, नॉट आऊट वरून वाद शिगेला पोहोचायचा. मात्र तेवढ्यापुरते. हुर्रेहुर्रे खेळताना मात्र खूप मजा यायची. दोन गट पाडून मातीच्या पुळण्या करत असू किंवा कोळशाने दिसणार नाहीत अशा रेघोट्या मारत असू. दुसऱ्या गटाच्या जागेत जाऊन त्या केलेल्या पूळण्या कोसळायच्या किंवा रेघोट्या पुसून टाकायच्या. ज्या गटाच्या जास्त शिल्लक राहतील तो गट जिंकायचा. डोंगर का पाणी खेळताना पण तितकीच मजा यायची. पावसाच्या दिवसात खड्या, खुब्या, खेळताना ओटीवर भलतीच गंमत यायची. चोर पोलीस खेळताना तसेच. आईस्क्रीमवाला भैया आला की त्याच पडवीच्या पायंडीवर बसून राहायचा आणि वाडीतील सर्व पोर तिथे आईस्क्रीम घेण्यासाठी जमा होत होती. कोणी काजूच्या बियांवर तर कोणी पैसे देऊन आईस्क्रीम घेत असत. आईस्क्रीम संपली की भैया डब्यातील तळाचा बर्फ अंगणात ओतत असे. तो बर्फ घेऊन खाण्यासाठी पोरांची त्यावर एकच उडी पडायची. ज्याला भेटला तो खूश. टोस्ट,खारी, बटर वाला भैयाची सुद्धा तिच ठरलेली जागा असायची. कासरिन मावशी येऊन तिथेच सर्वांना बांगड्या भरायची. पडवीतल्या या प्रेमळ वातावरणामुळे ती जागा केवळ वास्तू नव्हती, तर माणसांना जोडणारा पूल होता. बाल उद्यान होते. खापरीन आजीची पडवी म्हणजे केवळ एक जागा नव्हे, तर अनेक पिढ्यांच्या आठवणींचा गोफ आहे, जो काळाच्या ओघातही तसाच टिकून आहे.

काळ बदलला, माणसं बदलली, पण खापरीन आजीची पडवी मात्र आठवणींमध्ये तशीच आहे. तिथे घालवलेले क्षण, तिथल्या गप्पा, आणि आजीच्या गोष्टी अजूनही मनात घर करून आहेत. आजही त्या पडवीची आठवण आली की एक वेगळाच ऊबदारपणा मनभर पसरतो.

गावाकडच्या मोकळ्या शिवारात, अंगणात आणि खापरीन आजीच्या पडवीजवळ मातीशी खेळण्यात एक वेगळीच मजा होती. आजच्या मोबाइल आणि व्हिडीओ गेमच्या जगात ते साधेसुधे खेळ आठवले तरी मन भरून येतं.आजही आठवणीत खापरीन आजी जिवंत आहे.त्या काळी टीव्ही कमी आणि मातीशी खेळ जास्त होते. म्हणूनच आरोग्य चांगलं होतं, नाती घट्ट होती, आणि सगळ्यात महत्त्वाचं लहानपणीचे दिवस कायम लक्षात राहतील असे होते. आजही त्या पडवीत बसलो की लहानपणाचा ओलावा जाणवतो.

# रक्तपेढी- काळाची गरज



सिंधुदुर्ग जिल्ह्यातील देवगड तालुका डोंगराळ प्रदेशात मोडतो. जांभा कातळ आणि त्यामुळे हापूस आंब्यामुळे देवगड जगात प्रसिद्ध आहे. शिवाय पडवणे, विजयदुर्ग, देवगड पवनचक्की, मिठमुंबरी मिठबाव कुणकेश्वर अश्या समुद्रकिनाऱ्यांमुळे दिवसेंदिवस जगभरातील पर्यटकांचा ओढा देवगडकडे वाढत आहे. मात्र सिंधुदुर्ग जिल्हा मुख्यालय ओरस-सिंधुदुर्गनगरी पासुन तालुक्याचे अंतर खूपच दूर असल्याने काही बाबतीत तालुक्यात तितकीच असुविधा प्रकर्षाने जाणवते. विशेषतः आरोग्यविषयी समस्या नेहमी जाणवते. तालुक्यात ग्रामीण रुग्णालय असले तरी काही प्रसंगी मुख्य जिल्हा रुग्णालयात किंवा कोल्हापूर ,गोवा,मुंबई अश्या ठिकाणी रुग्णाला जावे लागते.

देवगड मधील जिल्हा ग्रामीण रुग्णालय तसेच इतर काही खाजगी रुग्णालयांत बरेच उपचार, शस्त्रक्रिया होत असतात. अश्या वेळीं आवश्यकता भासते ती रक्ताची. गरोदरपणात महीला भगिनींना ही बऱ्याच वेळा रक्ताची गरज लागते. रक्त पिशवींची पूर्तता करण्यासाठी आवश्यक असणारी रक्तपेढी ही ओरस सिंधुदुर्गनगरी येथे कार्यान्वित असून देवगड पासुन तिथे जायला जवळपास 90 किलोमीटरचे अंतर जावे लागते त्यासाठी जाणे-येणे आणि रक्त घेताना होणाऱ्या तपासणी मुळे खूप जास्त वेळ जातो. गंभीर परिस्थिती वेळीं रुग्णाला रक्ताची तात्काळ आवश्यकता असेल तर रुग्ण दगावण्याची शक्यता असते. देवगड तालुक्यात रक्तामुळे वेळ जाऊ नये म्हणून सन 2014 ला देवगड जिल्हा रुग्णालयात रक्त साठवण केंद्र,( ब्लड स्टोरेज) मंजूर करण्यात आले होते. परंतु प्रशासकीय अनास्थेपायी मंजूर केंद्र गेल्या वर्षीपर्यंत कार्यान्वित झाले नव्हते. देवगड तालुक्यातील समाजसेवी संस्था माध्यमातून , लोकप्रतिनिधींच्या मार्फत वारंवार पाठपुरावा करून सुध्दा रक्त साठवण केंद्र कार्यान्वित होत नव्हते. शेवटी सिंधु रक्तमित्र प्रतिष्ठान सिंधुदुर्ग या संस्थेच्या देवगड शाखेने या गोष्टीची गंभीरपणे दखल घेऊन तालुक्यातील सर्व सामाजिक मंडळ, तालुक्यातील सुजाण नागरिकांच्या मदतीने गेल्या वर्षी जानेवारी महिन्यात कायदेशीर मार्गाने उपोषणाचा इशारा देत प्रशासनास तालुक्यातील मंजूर केंद्र कार्यान्वित करण्यासाठी भाग पाडले. उपोषणासाठी दिलेल्या इशाऱ्याची दाखल घेत मोजक्या दिवसात केंद्रासाठी आवश्यक बाबींची पूर्तता करत दिनांक २६ जानेवारी २०२४ रोजी प्रशासनाने रक्त साठवण केंद्र सुरू केले. २०१४ पासुन झटणाऱ्या देवगड तालुकावासियांसाठी ही खूपच आनंदाची बाब होती. जिल्हा रक्तपेढीतून रक्तपिशवी आणण्यासाठी ४-५ तासाचा जो वेळ लागणार होता तसेच इतक्या दूरवर जण्या येण्याची दगदग धावपळ करावी लागे त्यासून खूप दिलासा मिळणार होता.जिल्हा ग्रामीण रुग्णालयात होणाऱ्या छोट्या शस्त्रक्रिये दरम्यान लागणारी, गरोदरपणात तिथे दाखल होणारी महिलांसाठी रक्तपिशवीची गरज आता तिथल्या तिथे भागत आहे. तालुक्यातील खाजगी रुग्णालयांत होणाऱ्या उपचारांसाठी सुध्दा रक्त साठवण केंद्रातून सोय केली जात आहे.

सिंधु रक्तमित्र प्रतिष्ठान सिंधुदुर्ग च्या माध्यमातून गेली सात आठ वर्षे रक्तदान चळवळीचे काम जोमाने सुरू आहे. देवगड तालुक्यात देवगड शाखेच्या वतीने स्थानिक मंडळाच्या सहाय्याने तालुक्यांतील विविध भागात रक्तदान शिबिर आयोजित करण्यात येतात. ज्या ठिकाणी यापूर्वी कधीही रक्तदान शिबिर घेण्यात आले नाही त्या भागात रक्तदान शिबिर घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यासाठी रक्तमित्र प्रतिष्ठान काम करत आहे. जिल्ह्यात किंवा जिल्हाबाहेर एखाद्या रुग्णाला कधी रक्ताची गरज पडली तर रक्तपेढीच्या माध्यमातून व्यवस्था होते. काही वेळीं तात्काळ रक्त दात्यांची गरज भासते त्यावेळी सिंधु रक्तमित्र निस्वार्थी रक्तदात्यांच्या मदतीने अशी गरज पूर्ण करते. परंतु अश्या परिस्थितीत आपल्या गावातील किंवा परिसरातील रूग्णाला जर कधी रक्ताची गरज भासलीच तर आपल्या परिसरातून त्या रुग्णाला मदत करणे असा प्रयत्न आपल्या सर्वांकडून व्हायला हवा. आमच्या गावात जर कोणाला रक्ताची गरज पडलीच तर आमच्या भागातूनच त्याची व्यवस्था करू अशी व्यवस्था त्या त्या गावात व्हायला हवी. तालुक्यात काही मंडळे दरवर्षी सातत्याने रक्तदान शिबिर आयोजित करत असतात. अश्या मंडळांमुळे सिंधुदुर्ग मधील रक्तपेढीची जिल्ह्यासाठी लागणारी रक्ताची गरज भागत आली आहे आणि आपला तालुका रक्तदान शिबिर आयोजित करण्यासाठी जिल्ह्यात नेहमी अग्रेसर राहीला आहे. **देवगड तालुक्यातील ग्रामीण रुग्णालयातील या रक्त साठवण केंद्राच्या वर्षपूर्ती निमित्त जिल्ह्यात सर्वात जास्त शिबिर आयोजित करणारा आणि रक्तदाते देणारा तालुका म्हणून कायम तालुक्याची ओळख राहो हीच सदिच्छा!**

**प्रकाश जाधव,**
**सचिव,सिंधु रक्तमित्र प्रतिष्ठान सिंधुदुर्ग, शाखा- देवगड**

# चंदा मामा

आपला हा "चंदा मामा" म्हणजे साक्षात चंद्र. तो आहे तरी कसा हे जाणून घेऊया. चंद्र हा पृथ्वीचा नैसर्गिक उपग्रह आहे. चंद्रावर सूर्याचा प्रकाश पडतो आणि तो परावर्तित होतो त्यामुळे चंद्र दिसतो. चंद्रावर खडकाळ पृष्ठभाग असून त्यावर लघुग्रह, उल्का आणि धूमकेतू यांच्यामुळे खड्डे पडले आहेत. चंद्र हा पृथ्वीभोवती लंबवर्तुळाकार कक्षेत फिरतो. चंद्राला पृथ्वीभोवती एक प्रदक्षिणा घालण्यासाठी 27.3 दिवस लागतात. चंद्रावर वातावरण क्षण आहे. म्हणजेच जवळजवळ कोणतेही वातावरण नाही. चंद्राच्या ध्रुवावरील विवरामध्ये थोडे थोडे गोठलेले पाणी साचले आहे. चंद्राची सरासरी त्रिज्या 1738 किलो मीटर आहे. पृथ्वी व चंद्रामधील अंतर 3 लाख 84 हजार 400 किलोमीटर असून हे अंतर पृथ्वीच्या व्यासाच्या सुमारे 30 पट आहे. चंद्राची गुरुत्वाकर्षण शक्ती ही पृथ्वीच्या गुरुत्वाकर्षण शक्तीच्या सुमारे 17 टक्के इतकी आहे. चंद्राला पृथ्वीभोवती एक प्रदक्षिणा घालण्यासाठी 27.3 दिवसाचा कालावधी लागतो तसेच चंद्र, सूर्य व पृथ्वी यांच्यातील भौगोलिक स्थानामुळे दर 29.5 दिवसांनी चंद्राच्या कलांचे एक आवर्तन पूर्ण होते. चंद्राने बऱ्याच वर्षांपासून पृथ्वीला लघुग्रहापासून संरक्षण केले आहे.

**चंद्राचे वातावरण-**
आतापर्यंत केलेल्या विविध चाचण्यातून चंद्राचे वातावरण मुख्यतः सोडियम, पोटॅशियम, रेडॉन,पोलोनियम,अरगॉन, हेलियम,ऑक्सिजन तसेच मिथेन, नायट्रोजन, कार्बन मोनॉक्साईड व कार्बन डाय-ऑक्साइड या वायूचे बनले असल्याचे सिद्ध झाले आहे.

**चंदा मामाची प्रत्यक्ष भेट-**
अमेरिकेचे अंतराळवीर नील आर्मस्ट्राँग यांनी 20 जुलै 1969 रोजी चंद्रावर पहिले पाऊल ठेवले. तसेच 23 ऑगस्ट 2023 रोजी भारताच्या चांद्रयान-3 ने चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर यशस्वी सॉफ्ट लँडिंग केलं. असं करणारा भारत हा जगातला पहिलाच देश ठरला. आत्तापर्यंत कुठल्याही देशाला चंद्राच्या दक्षिण ध्रुवावर लँडिंग करण्यात यश आलेले नाही.

**चंद्र निर्मितीची आख्यायिका -**
असे मानण्यात येते की, अमृत प्राप्तीसाठी देवांनी व दानवांनी केलेल्या समुद्र मंथनातून चंद्राची निर्मिती झाली. भगवान शंकराने हलाहल (विष) प्याल्यानंतर त्यांच्या घशात निर्माण झालेल्या दाहाला शांत करण्यासाठी,चंद्राचा उपयोग करण्यात आला, त्याचे प्रतीक म्हणून शंकराच्या डोक्यावर चंद्र आहे.

**भारतीय संस्कृतीतील चंद्र -**
भारतीय संस्कृतीत चंद्राला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आजही भारतातील बहुतेक सण व उत्सव हे चांद्र दिनदर्शिके प्रमाणेच साजरे केले जातात. उदा. नारळी पौर्णिमा , गणेश उत्सव, दसरा, कोजागरी पौर्णिमा, दिवाळी, गुढीपाडवा इत्यादी. इस्लामी पंचांगात अधिक महिना नसतो. त्यांचे वर्ष चांद्र मासानुसार चालते. मुसलमानी महिन्यांची सुरुवात चंद्रदर्शना नंतर होते.

**आपला चंदा मामा -**
चंद्राला,आपण सारे प्रेमाने "चंदा मामा"असे म्हणतो" इतकं त्याचे आणि आपले अनादि काळापासून जिव्हाळ्याचे घट्ट असे कौटुंबिक नाते आहे. तसेच महाकवी कालिदासापासून ते आजच्या नवकवी पर्यंत ज्यांनी ज्यांनी प्रेम या विषयावर साहित्यिक कृती निर्माण केल्या आहेत. त्यात कुठे ना कुठे चंदा मामा डोकावताना दिसतो.

प्रत्येक घरातली आई,आपल्या बाळाला सकाळ,संध्याकाळी भरवताना देखील चंद्राचे गाणे हमखास तिच्या ओठावर येते



## मनाच्या हिंदोळ्यावर



प्रा.के.एस.शिरबंदे ,दापोली.



**चांदोबा चांदोबा भागलास का**
**लिंबोणीच्या झाडामागे लपलास का**
**लिंबोणीचं झाड करवंदी**
**मामाचा वाडा चिरेबंदी!**

रात्री बाळाला झोपवताना अंगाई गीत म्हणते, त्या गीतात सुद्धा प्रामुख्याने हा चंदामामा असतोच असतो.

**निंबोणीच्या झाडामागे**
**चंद्र झोपला ग बाई**
**आज माझ्या पाडसाला**
**झोप का ग येत नाही**
**निंबोणीच्या झाडामागे**
**चंद्र झोपला ग बाई**

तर असं हे बहुतेकांचं बालपण चंदा मामाच्या सहवासात निश्चितच गेलं आहे. तर पुढे देखील हा चंदा मामा आपल्या आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर आपल्या मदतीला धावून येतो. कुणाच्या प्रेमात एखादा प्रियकर पडला तर त्याला चंद्राची आठवण येते व तो म्हणतो,

**उगवला चंद्र पुनवेचा,**
**मम हृदयी**
**दरिया उसळला प्रीतीचा**

तर आपल्या प्रेयसीच्या सौंदर्याचं कौतुक करण्यासाठी तो म्हणतो,

**चौदवी का चांद हो तुम**
**या आफताब हो,**
**जो भी हो तुम**
**खुदा की कसम,**
**लाजवाब हो !**


लग्न झालं, सुखी संसार चालू झाला तरी प्रियकर म्हणतो,

**पान जागे फुल जागे**
**भाव नयनी जागला,**
**चंद्र आहे साक्षीला**
**चंद्र आहे साक्षीला !**

आपला पती अगदी मृत्यू शय्येवर असतो अन् आज् त्याची ती शेवटची रात्र असते असे डॉक्टर सांगतात,अशावेळी त्याची पत्नी अतिशय भावविवश होऊन चंद्राला मदतीची साद घालते आणि खालील भावना व्यक्त करते.

**रुक जा रात ठहर जा रे चंदा**
**बीते ना मिलन की बेला**
**आज चांदनी की नगरीमे**
**अरमानो का मेला**
**रुक जा रात**

तर माणसाच्या आयुष्यातील सर्व सुख दु:खाच्या क्षणी चंदामामाचा सदैव आपल्या पाठीवर प्रेमाचा हात असतो हे बाकी नक्की.



# कायद्याचे बोलूया!



श्रीनिवास भार्गवराम घैसास,
वकील- उच्च न्यायालय व नोटरी- भारत सरकार
भ्रमणध्वनी- 9869080714.



## भाग -१
## जमिनीसंबंधी महत्त्वाचे उतारे

**ज्येष्ठ विधिज्ञ श्रीनिवास घैसास हे 'कायद्याचे बोलूया' या साप्ताहिक सदरातून सर्वसामान्य माणसाच्या जिव्हाळ्याचे विषय अगदी सोप्या शब्दांत वाचकांसमोर ठेवत आहेत. आजपासून ते जमीन व त्याविषयीची कायदेशीर माहिती याबाबत लेखन करत आहेत. वाचकांना त्यांच्या लेखांमधून शेतजमीन, बिनशेती जमीन, आरक्षण, कूळकायदा, फसवणूक व त्यावरील उपाय याबाबतीत माहिती मिळेल.**

**गाव नमुना सात/बारा हा जमिनीचा एक प्रकारे आरसाच असतो. महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ प्रमाणे गाव नमुना सहामध्ये हक्क फेरफार नोंदी कशा होतात, त्यात गफलती होण्याचा संभव कसा असतो हे आपण यानंतर पाहणार आहोत. तत्पूर्वी अशा ह्या फेरफार हक्क नोंदणी गाव नमुना सहामध्ये झाल्यावर व त्या मंजूर झाल्यावर त्याचे प्रतिबिंब गाव नमुना सात बाराच्या उताऱ्यात पडते. गाव नमुना सात बारा, हे हक्क नोंद आणि पीक पाहणी पत्रक अशा स्वरूपात असते. नोंदवहीतील फेरफार नोंदीची जंत्री असते.**

दुसऱ्या भागामध्ये मात्र गावनमुना बारामध्ये पिकाखालील आणि पडीक असलेल्या जमिनीची एकूण आकडेवारी दिलेली असते. आता प्रथम यामधील गाव नमुना सातबद्दल आपण माहिती घेऊया.

या गाव नमुना सातमध्ये वर लिहिल्याप्रमाणे गाव नमुना सहामधील फेरफार नोंदी त्या मंजूर झाल्याशिवाय करता येत नाहीत. अर्थात याला थोडे अपवाद आहेत ते म्हणजे अज्ञान पालनकर्त्याचे नाव गाव नमुना सातमधून काढून टाकताना किंवा दस्तऐवजाशिवाय हस्तांतरण नोंदले असेल तर ज्या आधारावर (उदा. तोंडी करार इ.) हस्तांतरण नोंदले असेल तर लेखी दस्तऐवजात रूपांतरित होताना मात्र वर लिहिल्याप्रमाणे गाव नमुना सहातील नोंदीव्यतिरिक्त गाव नमुना सातमध्ये नोंदवता येतात. या नमुन्यात काही पेन्सिल नोंदीही करतात. उदा. एखादा बदल नमुना सहामध्ये नोंद करण्यात आला मात्र तो मंजूर झालेला नाही असा फेरफार पेन्सिलने गाव नमुना सातमध्ये तलाठी लोक करतात. मात्र अशा नोंदीच्या बाबतीत फेरफार मंजूर झालेला नाही, असा शेरा तलाठ्यांनी द्यायचा आहे. नोंद मंजूर झाल्यावर क ती नोंद शाईने लिहील व रबराने पेन्सिल नोंद खोडून टाकेल.

या गाव नमुना सातमध्ये भूमापन क्रमांक, हिस्सा क्रमांक, शेतीव स्थानिक नाव, पोटखराबा, कृषी आकारणीसह असलेले क्षेत्र इ. महत्त्वाच्या नोंदी असतात. लागवडीसाठी पूर्णतः अयोग्य असलेल्या जमिनीची उदा खडकाळ क्षेत्र, नाले, खंदक, खाणी इ. पोटखराबा वर्ग 'अ'मध्ये नोंद करायची असते. तर काही कारणांसाठी राखून ठेवलेल्या जमिनीचा उदा. सार्वजनिक रस्ते, कालवे इ. समावेश पोटखराबा 'ब'मध्ये करावयाचा असतो. इतर अधिकारामध्ये कूळ, न्यायालयाची तगाई वसुलीसाठी अशा नोंदी येतात. त्यात कधी कर्जदार शेतकरी अशी नोंद कर्ज घेतल्यास त्यामध्ये करण्यात येते. मग शासनांच्या पूर्वपरवानगीशिवाय त्या जमिनीचे हस्तांतरण होत नाही. हक्क नोंदताना खालील गोष्टी महत्त्वाच्या असतात-

१) सदर नमुन्यातील शब्द, आकडे, नावे कधीही खोडू नयेत. नको असल्यास एक रेष मारून खोडावे म्हणजे पुन्हा सहज वाचता येईल.
२) इतर हक्क नोंदी.
३) फेरफार नोंदवहीतील फेरफार क्रमांक. तो लिहिणे फार महत्त्वाचे आहे. या गोष्टी लिहिताना किंवा उतारा घेणाऱ्या व्यक्तीने तपासून पाहणे अत्यावश्यक असते.

**आता आपण गाव नमुना बारासंबंधी थोडीफार माहिती पाहूया.**

या उताऱ्यात पोटखराबा आणि पडीक क्षेत्र यांच्यामध्ये भेद दाखवायची काळजी घ्यावयाची असते. तसेच सुधारित बियाणे, मिश्र पिके, फळझाड इत्यादी झाडाची नोंद यामध्ये घ्यावयाची असते. तसेच महाराष्ट्र राज्य झाडे तोडण्यासंबंधीच्या १९६६ च्या अधिनियमानुसार जी झाडे तोडण्यास बंदी घातली आहे, अशा सर्व झाडांची नोंददेखील त्यात ठेवायची आहे. यामुळे पर्यावरणाचा तोल बिघडवणारी वृक्षतोड अथवा अनधिकृत वृक्षतोड यासंबंधीची माहिती तात्काळ मिळणे शक्य होते.

गाव नमुना बारामध्ये जलसिंचनाचे एखादे पीक घेण्यात येत असेल तर त्या जलसिंचनाचा प्रकार त्यामध्ये नमूद करावयाचा आहे. तसेच या उताऱ्यात बिनभोगवट्याच्या जमिनीही दाखवायच्या आहेत. म्हणजेच ज्या जमिनी भूमापन क्रमांकात समाविष्ट नसतात, त्यांचादेखील यामध्ये समावेश करावयाचा असतो. वेगवेगळ्या हंगामात येणारी पिके नोंदवायची असतात. एवढेच नव्हे तर सदर पीक कुठल्या हंगामात घेतले जाते, तेही नमूद करावयाचे असते. गाव नमुना १२ व १३ मध्ये पडीक जमिनीची नोंद करताना वने, डोंगराळ व खडकाळ भूभाग, वाळवंट, नदी, इमारती, रस्ते, गुरे चारण्यासाठी वापरात असलेली जमीन इत्यादीची स्वतंत्ररीत्या नोंद करावयाची असते. मंडल निरीक्षकाने पिकाची पाहणी करताना तलाठ्यांनी दिलेल्या नोंदी तपासून पाहावयाच्या असतात. त्यात चूक आढळल्यास त्याने ती दुरुस्त करायची असते. मात्र अशी चूक दुरुस्त करताना दुसऱ्या बाजूच्या व्यक्तीला बाजू मांडण्याची संधी देणे आवश्यक असते.

या सर्व नोंदणीवरूनच राष्ट्रीय धोरण आखले जाते. निरनिराळे अंदाज घेतले जातात. पुष्कळ वेळा वरील नोंदी व्यवस्थित करण्यात टाळाटाळ होते. परिणामी राष्ट्राचे नियोजन हेच मुळी चुकीच्या आधारावर तयार होते. यासाठी संबंधित नोंदी बिनचूक असणे आवश्यक आहे.

**आतापर्यंत आपण ७/१२ च्या उताऱ्याविषयी पुष्कळशी माहिती घेतली.**

- परंतु, प्रत्येक माहिती कुठे नोंदवली जाते ?
- ७/१२ प्रत्यक्ष कसा पाहावा आदी सर्व माहिती घेण्याच्या दृष्टीने आपण या ठिकाणी ७/१२ च्या २/४ नमुन्यांचा अभ्यास करणार आहोत.
- ज्यायोगे ७/१२ चा उतारा कसा वाचायचा?
- त्यातील नोंदी कशा अद्ययावत ठेवायच्या याची माहिती घेण्याच्या दृष्टीने आपण ७/१२ चे प्रत्यक्ष काही नमुने पाहूया.
- यामुळे प्रत्येक माहिती नक्की कुठे दिली आहे?
- ती कशी पाहायची या साऱ्याची माहिती वाचकांना होईल, म्हणून आपण प्रत्यक्ष ७/१२ चे नमुने पाहूया. आता ७/१२ वर असणाऱ्या माहितीनुसार त्याचेदेखील आपणाला भाग पाडता येतील.
- उदाहरण देऊनच बोलायचे झाले तर साधा ७/१२ चा उतारा,
- कूळ लागलेला ७/१२ चा उतारा,
- बिनशेती जमिनीचा ७/१२ उतारा असे एक ना अनेक वर्गीकरण ७/१२ च्या उताऱ्यांचे करता येईल.

मात्र सर्वसाधारणपणे दैनंदिन जीवनात वाचकांना अनुभवास येणाऱ्या ७/१२ चीच माहिती आपण या ठिकाणी पाहूया.

**हे ७/१२ चे उतारे पाहत असताना वाचकांनी एक गोष्ट मुद्दामहूनच लक्षात ठेवावयास हवी ती म्हणजे यातील गावांची नावे, व्यक्तींची नावे, आदी सर्व तपशील हा काल्पनिक आहे. कुठल्याही एखाद्या ७/१२ शी त्यांचे साधर्म्य आढळले तर तो निव्वळ योगायोग समजावा.**

**आता आपण प्रत्यक्ष ७/१२ च्या उताऱ्यांच्या नमुन्यांकडे वळूया.**






# गर्भाधान संस्कार

## अध्यात्म



ज्योतिर्विंद उदय दुदवडकर,
बुरंबावडे- देवगड
मो.८३९००५३९८४

सोळा संस्कारातील ' गर्भाधान संस्कार ' हा पहिला महत्त्वाचा संस्कार मानला जातो. जन्माला येणारे बालक हे निरोगी, सत्वशील, धर्मशील, सामर्थ्यवान, बलवान, कर्तृत्ववान, कलासंपन्न, ज्ञानसंपन्न, उदार, करुणाशील, सुशील, सुसंस्कृत, सद्गुणी, शूर, पराक्रमी, न्यायशील, कर्मशील असावे या उद्देशाने संस्काराची फलद्रुपता साधण्याचा गर्भाधान संस्कारात प्रयोग असतो. गर्भाधानासाठी साधण्याच्या समागमाचा मुहूर्त साधणे आवश्यक मानले जाते. शुभमुहूर्तावर शुभफलित साध्य होते अशी शास्त्राची संकल्पना आहे.

एखाद्या कर्मासाठी काळाची १) तिथी, २) वार, ३) नक्षत्र, ४) करण आणि ५) योग ही पाचही अंगे (पंचांगे) ज्या कालावधीत शुभ असतात त्या कालावधीला ' शुभमुहूर्त ' म्हणतात. संत तुकारामांनी म्हटले आहे, "शुद्ध बीजापोटी । फळे रसाळ गोमटी ।।" शुद्ध क्षेत्रात पेरलेले शुद्ध बीज हे शुद्ध आणि उत्तम फल देते. गर्भाधान संस्कारासाठी सुयोग्य मुहूर्त काढून विष्णू व प्रजापती या देवतांची पूजा केली जाते. विष्णू व प्रजापति या गर्भाधान संस्काराच्या देवता आहेत. या देवतांसाठी होम केला जातो. या होमामध्ये भुवनेश्वरी शांती तसेच इंद्र इंद्राणी यांचे पूजन करून त्यांनाही हविष्यांन्नाची आहुती दिली जाते. यामुळे अशुभ मासातील रजोदर्शनाने उद्भवणाऱ्या अरिष्टांचा नाश होतो अशी संकल्पना आहे.

या संस्कार विधीत संकल्प, गणेश पूजन, पुण्याहवाचन, मातृका पूजन, नांदीश्राद्ध, आचार्यवरण केले जाते. मुख्य देवता, मातृका देवता, अग्नी, नवग्रह यांची स्थापना व पूजा करून या सर्वांना होमाद्वारे हविष्यान्नाहुती दिली जाते. बली दिला जातो. गर्भाधानाच्या संस्काराच्या संकल्पात उत्पन्न होणाऱ्या बीजरूप गर्भाचे सर्व पाप नाहीसे व्हावे आणि जन्माला येणारे बालक हे निरोगी, सत्वशील, धर्मशील, सामर्थ्यवान, बलवान, कर्तृत्ववान, कलासंपन्न, ज्ञानसंपन्न, उदार, करुणाशील, सुशील, सुसंस्कृत, सद्गुणी, शूर, पराक्रमी असावे अशा फलाची अपेक्षा केली जाते.सोळा संस्कारातील गर्भाधान संस्कार हा पहिला महत्त्वाचा संस्कार मानला जातो.

जन्माला येणारे बालक हे निरोगी, सत्वशील, धर्मशील, सामर्थ्यवान, बलवान, कर्तृत्ववान, कलासंपन्न,ज्ञानसंपन्न, उदार, करुणाशील, सुशील, सुसंस्कृत, सद्गुणी, शूर, पराक्रमी, न्यायशील, कर्मशील असावे या उद्देशाने संस्काराची फलद्रुपता साधण्याचा गर्भाधान संस्कारात प्रयोग असतो. गर्भाधानासाठी साधण्याच्या समागमाचा मुहूर्त साधणे आवश्यक मानले जाते. शुभमुहूर्तावर शुभफलित साध्य होते अशी शास्त्राची संकल्पना आहे.

जन्माला येणाऱ्या अपत्यास विष्णुचे रूप आणि प्रजापतीचे सामर्थ्य प्राप्त व्हावे ही मनोकामनाही संकल्पातून तसेच फल प्राप्तीच्या अपेक्षेने केलेल्या पूजनोत्तर व हवनोत्तर प्रार्थनेतून अभिव्यक्त केली जाते. बीज आणि गर्भ यासंबंधाचा दोष दूर होऊन क्षेत्र शुद्ध व्हावे हा गर्भाधान संस्काराचा मुख्य उद्देशही प्रार्थनेत अभिव्यक्त असतो.




गर्भाधान संस्कारसाठी स्त्रीच्या रजोदर्शनाचा कालावधी महत्त्वाचा आहे. हा कालावधी अर्थात रजोदर्शनाचा दिवस ठरवण्याची पद्धत अशी आहे, जर राजोदर्शन रात्री झाले असेल तर रात्रीमानाचे (सूर्यास्तापासून सूर्योदयापर्यंतच्या कालावधीचे तीन समान विभाग करावेत. पहिल्या दोन विभागाच्या कालावधीत रजोदर्शन झाले असल्यास पूर्वीचा (आदला) दिवस दर्शनाचा दिवस म्हणून निश्चित करावा आणि तिसऱ्या भागात रजोदर्शन झाले असल्यास दुसरा (उजाडता) दिवस हा राजोदर्शनाचा दिवस म्हणून निश्चित करावा. याप्रमाणे निश्चित केलेला दिवस हा प्रथम दिवस मानून या दिवसाच्या सापेक्ष सोळा रात्रीपर्यंत सर्वसाधारणतः सरासरी २७ दिवसांनी मासिक पाळी येणाऱ्या स्त्रीचा ऋतू काळ मानावा. या ऋतुकालातील उत्तरा फालगुनी, उत्तराषाढा, उत्तराभाद्रपदा, मृग, हस्त, अनुराधा, रोहिणी, स्वाती, श्रवण, धनिष्ठा व शतकारका यांपैकी पती-पत्नी उभयतांच्या जन्मपत्रिकेनुसार उभयतांना शुभ असणारे नक्षत्र, वृषभ मिथुन कर्क सिंह कन्या तुला धनु व मीन यांपैकी लग्न, तत्कालीन लग्न कुंडलीतील १,४,५,७,९,१० या स्थानात शुभ ग्रह असणे या बाबी विचारात घेणे महत्त्वाचे असते. ज्योतिषशास्त्रात पुत्र व कन्या त्याचप्रमाणे नपुसक अपत्य याबाबतही विचार करून काही सूत्रे सांगितली आहेत. यामध्ये अपत्या कन्या किंवा पुत्र प्राप्तीच्या अपेक्षेप्रमाणे विषम रात्री, सम रात्री, रविवार, मंगळवार, गुरुवार हे पुरुष ग्रहांचे वार (विशेषतः गुरुवार) सोमवार व शुक्रवार हे श्री ग्रहांचे वार विचारात घेण्यास सुचित केले आहे. बुधवार व शनिवार हे नपुसक ग्रहांचे वार टाळावेत.

राजोदर्शनापासून पहिल्या चार रात्री, तिथी व नक्षत्रे यांचा संधीकाल, श्राद्धाची तिथी व श्राद्धापूर्वीची तिथी, तसेच मूळ, मघा व रेवती ही नक्षत्रे, अष्टमी, चतुर्दशी, दर्श अमावस्या, पोर्णिमा या तिथी समा कामासाठी टाळाव्यात. महापात, व्यतिपात, वैद्युती हे योग, संक्रांति, ग्रहण हे काल टाळावेत. शुक्ल पक्षात चंद्रबळ व कृष्ण पक्षात ताराबळ असणे आवश्यक आहे. पुत्र वा कन्या संतती प्राप्तीबाबत साधावयाच्या अनेक कृती आहेत ज्या ज्योतिषशास्त्र, कोकशास्त्र व शरीरशास्त्र या सर्वांचा परामर्श घेऊन साधणे फलप्राप्तीच्या दृष्टीने उपयुक्त ठरू शकते. यासाठी यामध्ये तज्ञता व अनुभव असणाऱ्या गुरुजींचे यथोचित मार्गदर्शन घ्यावे व मिळालेल्या मार्गदर्शनाचा काटेकोर, यथोचित, सुयोजित उपयोग करून घ्यावा. मला स्वतःला याबाबत अनुभव आहे की, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले असता पती-पत्नी त्या मार्गदर्शनाचा येथे अंमल करीत नाहीत आणि अपेक्षाभंग झाल्यानंतर ते स्वतः मला सांगतात,
"तुम्ही सांगितलेल्या गोष्टी साध्य करता आल्या नाहीत." हे सांगताना ते उभयता एकमेकांना दोषी ठरवत असतात. असे होता उपयोगी नाही. त्रिकाल ज्ञानी ऋषीमुनी, शास्त्र पारंगत विद्वान यांनी वेदांमध्ये सांगितलेल्या बाबींचे कालानुरूप उपयुक्त असे ज्ञान विविध ग्रंथांतून दिलेले आहे. त्या ज्ञानाच्या सापेक्ष वर्तनाने बहुतांशी अपेक्षित साधता येते.

अनियमित पाळी ही नियमित होण्यासाठी ज्ञानसापेक्ष प्रयत्न होणे गरजेचे आहे. अनियमितता निवारण होत नसेल तर त्यावर तज्ञ व अनुभवी डॉक्टर, ज्योतिषी इत्यादींचे मार्गदर्शन व सल्ला घेऊन उपाय करायला हवेत. विशेषतः स्त्रियांनी नियमित येणारी पाळी विविध समारंभ वगैरेंसारख्या कारणांसाठी मागेपुढे करण्यासाठी औषधे, गोळ्या यांचे उपाय करणे टाळावे. एक वेळ समारंभ नाही साधला तरी चालेल परंतु नियमित येणारी पाळी बिघडवू नये. त्याचे दुष्परिणाम पुढे संतती लाभ व संतती यांवर होऊ शकतात. पाळीच्या नियमिततेवरही गर्भसंभवकाळ ठरत असतो. अनियमित मासिक पाळीत हा कालावधी अनियमित असू शकतो. योग्य गर्भसंभव कालावधी साध्य न झाल्यास संतती होणे असाध्य होऊ शकते.

गर्भथान संस्कारात पती पत्नीच्या उजव्या नाकपुडीत अश्वगंधा किंवा दुर्वा यांचा रस पिळतो जो पत्नीच्या नाकपुडीतून तिच्या पोटात जातो. क्षेत्र आणि बीज शुद्धीसाठीचा हा एक आयुर्वेदिक उपाय देखील म्हणता येईल.

गड किल्ल्याच्या ज्या दरवाजामधून आत प्रवेश करतो ते प्रवेशद्वार भारदस्तही असले पाहिजे. जेणेकरून येणाऱ्या आगंतुकाला एकाच वेळी भारावून टाकले पाहिजे. आणि त्याच्या बुलंदपणाच, अभेदयपणाच त्याच्यावर दडपणही आले पाहिजे. दोन्ही बाजूस दोन भक्कम राकट बुरुज, दरवाजाकडे येण्यासाठी एकच अरुंद वाट, दरवाज्याकडे जाताना तटबंदी कायम उजव्या हाताला येणार. असं का बरं ?

एकावेळी शत्रू सैन्याची मोठी झुंड दरवाजावर यायला नको. हत्ती दरवाजाला भिडू नये म्हणून मुख्य दरवाजाचा रस्ताही चिंचोळा आणि वक्राकार बांधकाम केलेला दिसतो. हत्तीला सरळ पळत येऊन धडक देणे महाकठीण, हीच तर खरी बाधकाम तंत्राची किमया. गिरिदुर्गावर मुख्य दरवाजा पायथ्याला किंवा एकदम वरच्या टोकावर बांधलेला नाही. तो सर्वसाधारणपणे एकूण उंचीच्या मध्यावर किंवा ६०/४० टक्यांवर बांधलेला दिसतो. कारण तिथपर्यंत हत्ती पोहचणे ही शक्य नसते.

तसेच दरवाजाकडे येताना शत्रूच्या उजव्या हाताला तटबंदी बांधलेली असते. कारण तटबंदी वरून आपल्या सैन्यांनी फेकलेले दगड धोंडे, भाले, सुरे यांनी शत्रूवर मारा करता येत असे. ढाल हमेशा डाव्या हातात असते आणि उजव्या हातात तलवार. तटबंदीतून होणारा मारा ढालीवर घेता येऊ नये म्हणून तटबंदी उजव्या हाताला बांधलेली दिसते.

गड किल्ल्यावरील बांधकाम इतके अचूक असताना तेथील पायऱ्या एक सारख्या बांधलेल्या दिसत नाहीत. त्या कमी जास्त उंचीच्या, कमी जास्त रुंदीच्या दिसतात. कारण शत्रू पळत आलाच तर पायऱ्याचा अंदाज चुकून तो धडपडणार किंवा खाली बघून पळणार, त्यावेळी बुरुजावरील रक्षकांचे ते सावज बनणार. मात्र आत्ताच्या पर्यटकानां वाटते, काय जुन्या काळतले बांधकाम तंत्रज्ञान पायऱ्या सुद्धा एक सारख्या बांधू नयेत. ही लढाऊ गोची सहसा लक्षात येत नाही. तसेच दरवाज्याच्या डोक्यावर सज्जे ठेवून, त्याच्या तळात भोके ठेवीत. त्यांतून शत्रूंवर गरम डांबर, उकळते तेल, गरम पाणी तसेच गरम शिसे शिंपडणे शक्य होई.

शत्रू सैनिकांवर शेवटच्या टप्प्यातही मारा करता यावा यासाठी काही गड किल्ल्यांवर मुख्य दरवाजाच्या वरच्या बाजूस पाण्याची कृत्रिम टाकी तयार केलेली आहेत. टाकी खोदण्याच्या दगडातून दरवाज्याचे बांधकाम केलेले लक्षात येते. तसेच दरवाजावर तैनात असलेल्या सैनिकांना दररोजच्या वापरासाठी लागणारे पाणी व्यवस्था हि होते. शत्रू जर मुख्य दरवाजात चुकून आलाच तर वरची टाकी सुरुंग लावून फोडायची. आकस्मित आलेल्या पाण्याच्या लोंढ्याने, त्याबरोबर वाहून आलेल्या दगड धोंड्यामुळे शत्रू सैनिकांना काय करावे ते कळत नाही. दगड धोंडे लागल्यामुळे ते जखमी होतात त्यामुळे त्यांना पळता भुई थोडी होते. तसेच दरवाज्याला आकस्मात आग लावल्यास वरील पाणी आणून ती विझवता येई. अशी बहुउद्देशीय करणे आपल्या पूर्वजांनी बांधकाम तंत्रात योजिलेली दिसतात.



## गड किल्ल्यातील मुख्य दरवाजाची लढाऊ गोची.



**'गड किल्ल्याचे स्थापत्य शास्त्र'**

लेखक : विलास भि. कोळी
संपर्क. 9763 08 4499
kolivilas2@gmail.com

**गोमुखी बांधणी.**

काही गड किल्ल्यावर गोमुखी बांधणीची प्रवेशद्वारे दिसतात. तेथील तटबंदीची रचना इंग्रजी ‘D’, मराठी ‘थ’ किंवा ‘S’ अक्षरा सारखी गोमुखी दरवाजाची बांधणी केली जाते. गोमुखी रचनेच्या प्रवेशद्वारासमोर दोन बुरुजांमधील अंतर खूप कमी, तुलनेने अधिक चढाच्या अरुंद पायऱ्या आणि ऐन दरवाजासमोर सरळ रेषेत कमीत कमी अंतर अशी वैशिष्ट्ये आढळतात. गडाचे दरवाजे खूप जाड लाकडी फळ्यांचे असत, व त्यावर लोखंडी पट्या व त्यावर खिळे लावलेले असत. ते फोडण्यासाठी हत्ती सारख्या बलदंड प्राण्याने तेथे जोरदार मुसंडी मारून धडक दिली तर काही धडकानंतर हा दरवाजा तुटतो. त्यातून शत्रुसैन्य आत घुसू शकते. ही शक्यताच नाहीशी करण्यासाठी अरुंद जागा, चढावरील अरुंद पायऱ्या आणि धडक देण्यासाठी आवश्यक असणारी दरवाजापुढे सरळ रेषेतील मोकळी जागा नसणे, ह्या गोष्टी तेथे अवलंबिल्या आहेत. अशा तऱ्हेच्या बांधकामामागे काही कार्यकारण भाव आहे.

गडाचा मुख्य दरवाजा, संरक्षणाच्या दृष्टीने याची बांधनी अतिशय महत्त्वाची. म्हणूनच दुर्गबांधनीतील एक अद्भूत प्रयोग आपल्याला पहायला मिळतो, तो म्हणजे महादरवाजाची गोमुखी बांधणी. दरवाजे बांधावे ते खालील मारा चुकवून, पुढे बुरुज देऊन, येताजाता सर्व बुरुजांचे आहारी पडोन दरवाजे बांधावे, असा उल्लेख आज्ञापत्रात आहे. म्हणजे दरवाजे बांधताना तो सहजासहजी खालून दिसणारा नसावा, दोन बुरूजामधील कमीतकमी अंतर आणि त्यामध्ये दरवाजा. तो तटबंदीचा भाग असल्यासारखा वाटावा, जेणेकरून शत्रूस तो ओळखू येऊ नये. या प्रकारची बांधणी जवळपास सर्व किल्ल्यांवर हमखास दिसते. अशाच बांधणीला गोमुखी पद्धतीची बांधणी म्हणतात. अत्यंत भरभक्कम, दगडात बांधलेले दरवाजे आपल्या बुलंदपणाने, अभेद्यपणाने आजही ताठ मानेने उभे असल्याचे आपल्या लक्षात येते.

**गोमुखी बांधणीचा उपयोग :-**

**पहिला उपयोग -** म्हणजे शत्रू सैन्य गडाच्या मध्यभागी बांधलेल्या गोमुखी बांधणीच्या दरवाज्यापर्यंत पोचलेच तर तेथे असलेल्या कमी जागेमुळे आजूबाजूच्या बुरुजावरून ते मारा करण्याच्या टप्प्यात येते आणि दगडगोटे, बाण, जळते गोळे, बंदुकांनी त्यांच्यावर मारा करता येऊन त्यांना घायाळ करता येते.

**दुसरा उपयोग:-** म्हणजे हत्तीच्या धडकेने अथवा मोठ्या ओंडक्याच्या माराने दरवाजा तोडता येत नाही. कारण एकदम वळण असल्याने फोडण्यासाठी लागणारा वेग आणि त्याद्वारे मिळणारे बल (force) प्राप्त करता येत नाही.

**तिसरा उपयोग:-** तिसरा उपयोग म्हणजे महाद्वारापाशी येण्यासाठीच्या पायऱ्याला चढ असतो त्या पायऱ्या एक सारख्या उंचीच्या नसतात. त्यामुळे शत्रूला खाली बघूनच वर चढत यावे लागते. त्यातच धापा टाकून शत्रु सैन्य दमून जाते. त्यामुळे त्याचे लक्ष विचलित होते.

**चौथा उपयोग:-** शत्रू ज्यावेळी दरवाज्याजवळ येईल त्यावेळी दोन्ही तिन्ही बाजूने उंचच उंच बुरुज पाहून त्याला आपण खोल एखाद्या विहिरीमध्ये आहोत असे वाटून त्याची धडकी भरेल.

**गोमुखी दरवाज्याची वैशिष्ट्ये:-**

सहज दर्शनी नसणारे प्रत्यक्ष द्वार, चढावरील अरुंद पायऱ्या, दोन बुरुजामधील चिंचोळी जागा, दरवाज्य समोर सरळ रेषेत पुरेशी मोकळी जागा नसणे, दरवाजाकडे येताना कमीतकमी दोन तीन वेळा करावा लागणारा दिशा बदल. दरवाज्या शेजारील उंच बुरुजावरून हल्ला करून शत्रूला जेरीस आणण्याचे नियोजन हि गोमुखी दरवाज्याची वैशिष्ट्ये आहेत.

**उदा-**

**रायगड, प्रतापगड, सिंधुदुर्ग ई. दोन बुरूजांच्या कवेत अगदी शेवटपर्यंत न दिसता लपवलेली बांधणी. दोन्ही बाजूस भक्कम बुरुज, अरूंद अधिक चढाच्या पायऱ्या ही बांधणीतील खास वैशिष्ट्ये. शत्रूला अगदी शेवटपर्यंत न दिसता दोन भक्कम बुरूजांच्या मध्ये लपवलेली अशी बांधणी.**



# सरकारी योजना/नोकरी

## ‘मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना’

**प्रत्येक युवक-युवतींना शिक्षणानुरूप रोजगाराच्या संधी मिळाव्यात यासाठी युवक-युवती आणि त्यांचे पालक जागरूक असतात. राज्य शासन देखील त्यांच्या रोजगार निर्मितीसाठी सर्वतोपरी प्रयत्न करीत असते. युवा वर्गाचे शिक्षण पूर्ण झाल्यांनतर वेळेत योग्य मार्गदर्शन आणि व्यवसाय करणाऱ्यांसाठी भांडवल उपलब्धता शासन विविध योजनांच्या माध्यमातून करून देत आहे. रोजगार इच्छुक युवक-युवती आणि रोजगार देणाऱ्या विविध आस्थापना यांच्यामध्ये संवाद आणि समन्वय साधून उद्योग क्षेत्राला आवश्यक असणारे कुशल मनुष्यबळ आणि युवा वर्गाला रोजगाराच्या अधिकाधिक संधी उपलब्ध करून देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने ‘मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना’ सुरू केली आहे.**

या योजनेत बारावी उत्तीर्ण, आय.टी.आय., पदविका, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या युवकांना प्रशिक्षणाअंती अधिकाधिक रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याबरोबरच विद्यावेतन देखील मिळणार आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी भारताला जगात अग्रेसर बनविण्यासाठी कौशल्य विकासाच्या अनेक योजना सुरू केल्या आहेत. केंद्र सरकारने नुकत्याच सादर केलेल्या अर्थसंकल्पातही आगामी पाच वर्षात 4.1 कोटीहून अधिक युवकांना रोजगार आणि कौशल्यविकासाच्या संधी देशात निर्माण करण्यासाठी दोन लाख कोटी रूपयांची तरतूद केली आहे. आंतरराष्ट्रीय कामगार संघटनेने प्रसिद्ध केलेल्या भारताच्या रोजगार 2024 अहवालानुसार, भारत हा 2026 पर्यंत सर्वाधिक तरुणांचा देश असेल. ग्रामीण व शहरी विकासातील दरी दूर करून प्रत्येकाला समान संधी देण्यासाठी शासन तत्पर असून देशाला प्रगतीपथावर नेण्यासाठी हा निर्णय महत्त्वपूर्ण आहे.

राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग आणि ‘मुख्यमंत्री जनकल्याण कक्ष’ यांच्यामार्फत संयुक्तपणे ‘मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना’ राबविली जाणार आहे. रोजगार इच्छुक युवक-युवती आणि उद्योजक आणि रोजगार देणाऱ्या विविध आस्थापना यांना एकाच व्यासपीठावर आणण्यासाठी शासनाचा प्रयत्न आहे. ही योजना राज्यभर यशस्वीपणे राबविण्यासाठी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या आयुक्त निधी चौधरी (भा.प्र.से.) यांच्या देखरेखीखाली विभाग काम करीत आहे.
‘

**मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजना’** या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना 12 वी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना 6 हजार रुपये, आयटीआय व पदविकाधारक विद्यार्थ्यांना 8 हजार तर पदवीधर, पदव्युत्तर विद्यार्थ्यांना 10 हजार रुपये विद्यावेतन दरमहा डीबीटी पद्धतीने येणार आहे.

या उपक्रमांर्तगत बारावी, आय.टी.आय.,पदविका, पदवी व पदव्युत्तर शैक्षणिक पात्रता धारण केलेले रोजगार इच्छुक उमेदवारांनी व रोजगार देणा-या विविध आस्थापनांनी, उद्योजकांनीही कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या https://rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर ऑनलाईन नोंदणी करणे आवश्यक आहे.

**योजनेचे निकष व पात्रता:**
योजनेकरिता उमेदवाराचे किमान वय 18 व कमाल 35 वर्ष असावे. किमान शैक्षणिक पात्रता 12 वी पास, आयटीआय,पदविका,पदवी, पदव्युत्तर असावी. पुढील उच्च शिक्षण घेत असलेले उमेदवार या योजनेत पात्र असणार नाहीत. उमेदवार हा महाराष्ट्राचा रहिवासी असावा. उमेदवाराचे बँक खाते आधार संलग्न असावे. उमेदवाराने कौशल्य, रोजगार व उद्योजकता आयुक्तालयाच्या संकेतस्थळावर नोंदणी करुन रोजगार नोंदणी क्रमांक प्राप्त केलेला असावा. योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थींना त्यांच्या शैक्षणिक अर्हतेप्रमाणे शासनामार्फत विद्यावेतन दरमहा दिले जाईल. प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थीची दैनिक हजेरी संबंधित आस्थापना,उद्योग ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येईल. या ऑनलाईन उपस्थितीच्या आधारे प्रशिक्षणार्थीचे विद्यावेतन प्रशिक्षणार्थीच्या थेट बँक (डीबीटी) ऑनलाईन पद्धतीने दरमहा अदा करण्यात येईल.विद्यावेतनामध्ये सबंधित उद्योजकामार्फत जाहीर केलेली सुट्टी व अनुज्ञेय रजा याचा अंतर्भाव राहील. उद्योजक उमेदवारांना या विद्यावेतनाव्यतिरिक्त अधिकचे विद्यावेतन देऊ इच्छित असेल तर वाढीव रक्कम उमेदवारांना अतिरिक्त स्वरुपात देऊ शकेल.

या योजनेंतर्गत प्रशिक्षणार्थी महिन्यातून 10 दिवस अथवा त्यापेक्षा जास्त दिवस गैरहजर असला तर, सबंधित प्रशिक्षणार्थीस त्या महिन्याचे विद्यावेतन देण्यात येणार नाही. प्रशिक्षणार्थीने वरील अटींची पूर्तता केली असली परंतु, संबंधित प्रशिक्षणार्थी प्रशिक्षणाच्या पहिल्याच महिन्यात प्रशिक्षण सोडून गेल्यास असा प्रशिक्षणार्थी विद्यावेतनास पात्र राहणार नाही. या योजनेच्या दरम्यान प्रशिक्षणार्थीस कायम, नियमित स्वरूपाचा रोजगार अथवा स्वयंरोजगार प्राप्त झाल्यास अथवा प्रशिक्षण सोडून गेल्यास अथवा अनधिकृत गैरहजर राहिल्यास या योजनेंतर्गत प्रशिक्षण व त्या अनुषंगाने विद्यावेतन घेण्यासाठी पात्र राहणार नाही. या योजनेंतर्गत शिकाऊ उमेदवारी (NAPS /MAPS) पूर्ण केलेले व करीत असलेले उमेदवार पात्र राहणार नाहीत. एका उमेदवारास या योजनेचा लाभ एकदाच घेता येईल.
राज्यामध्ये शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-2020 (NEP-२०२०) अंतर्गत नवीन अभ्यासक्रम आराखड्यांतर्गत एकूण 6 व्हर्टीकल्स पैकी 5 व्या आणि 6 व्या व्हर्टिकल्समध्ये कौशल्य आधारीत अभ्यासक्रम, ऑन जॉब ट्रेनिंग आणि ॲप्रेंटिसशीप या नाविन्यपूर्ण अभ्यासक्रमांचाही समावेश करण्यात आला आहे. युवकांना कौशल्यपूर्ण प्रशिक्षण, सॉफ्टस्किल ट्रेनिंग, लाईफस्किल ट्रेनिंग, तांत्रिक प्रशिक्षण देऊन तरुणांची रोजगारक्षमता वाढविणे तसेच शिक्षण घेतांना कामाच्या ठिकाणी कामाशी संबंधित कार्यकौशल्य आत्मसात करणे, या उद्देशाने ज्या अभ्यासक्रमात कमीत कमी 6 महिन्यांचा ऑन जॉब ट्रेनिंग किंवा ॲप्रेंटिसशिपचा समावेश आहे.अशा अभ्यासक्रमांतील विद्यार्थीदेखील मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी पात्र ठरतील.

**खासगी व शासकीय आस्थापनांमध्ये रोजगाराच्या मिळणार संधी**
लघु आणि मध्यम (SMEs) व मोठे उद्योग, स्टार्टअप्स, सहकारी संस्था, शासकीय, निमशासकीय आस्थापना, महामंडळ, सामाजिक संस्था (कंपनी कायदा, 2013 मधील सेक्शन 8) आणि विविध आस्थापना इ. यांना आवश्यक असलेल्या मनुष्यबळाची मागणी विभागाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पद्धतीने नोंदवतील.
किमान 20 रोजगार देणाऱ्या आस्थापना या कार्य प्रशिक्षणासाठी सहभागी होण्यासाठी पात्र असतील. या आस्थापना व उद्योगामध्ये सध्याच्या मनुष्यबळावर आधारित सुमारे 10 लाख कार्य प्रशिक्षणाच्या संधी प्रत्येक आर्थिक वर्षात या योजनेच्या माध्यमातून उपलब्ध होतील.

**विविध खासगी व शासकीय आस्थापनासाठी निकष**
आस्थापना व उद्योग महाराष्ट्र राज्यात कार्यरत असावा.आस्थापना, उद्योगाने कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी. आस्थापना, उद्योगाची स्थापना किमान 3 वर्ष पूर्वीची असावी. कार्य प्रशिक्षणाचा कालावधी 6 महिने असून प्रशिक्षण पूर्ण केलेल्या उमेदवारांना संबंधित आस्थापनेकडून प्रशिक्षण यशस्वीरित्या पूर्ण केल्याचे विहित नमुन्यातील प्रमाणपत्र देण्यात येईल. या योजनेच्या प्रशिक्षणानंतर प्रशिक्षण पूर्ण केलेले उमेदवार सबंधित उद्योग, आस्थापना यांना योग्य वाटल्यास व उमेदवाराची इच्छुकता असल्यास त्यांना रोजगार देण्याच्या दृष्टीने संबंधित आस्थापना निर्णय घेऊ शकतील. योजनेंतर्गत प्रशिक्षण घेत असलेल्या उमेदवारांना किमान वेतन कायदा, राज्य कामगार विमा कायदा, कामगार भविष्य निर्वाह निधी कायदा, कामगार नुकसान भरपाई कायदा व औद्योगिक विवाद कायदा लागू राहणार नाही.
या योजनेंतर्गत खाजगी क्षेत्रातील आस्थापना, उद्योजकाकडे एकूण कार्यरत मनुष्यबळाच्या 10 टक्के व सेवा क्षेत्रासाठी 20 टक्के इतके उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतील. केंद्र व राज्य शासनाच्या शासकीय, निमशासकीय या आस्थापना,उद्योग,महामंडळ यामध्ये मंजूर पदाच्या 5 टक्के इतके उमेदवार कार्य प्रशिक्षणासाठी घेता येतील.
या योजनेसाठी ‘राज्यस्तरीय सनियंत्रण समिती’ व जिल्हास्तरावर ‘कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता जिल्हा कार्यकारी समिती’ या योजनेचा वेळोवेळी आढावा घेवून योजनेसबंधित स्थानिक स्तरावरील समस्यांचे निराकरण केले जाईल. जिल्हास्तरावर सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता हे या योजनेचे अंमलबजावणी अधिकारी असतील.

**दैनिक सिंधुदुर्ग समाचार(मुख्य आवृत्ती ,सिंधुदुर्ग,)संस्थापक,संपादक,कै.प्राचार्य मुकुंद.कदम MALLB** मालक,मुद्रांक,प्रकाशक ॲड रुपाली कदम डांगे **BSL,LLB,MCA RNI No.४३७११/८५** मुद्रणस्थळ न्यू विक्रम मुद्रणालय,कोपर्डे,जि .कोल्हापूर, महाराष्ट्र ४१६२०४ येथे छापून प्रकाशनस्थळ/कार्यालय एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग, महाराष्ट्र ४१६००२ येथे प्रकाशित केले. मुद्रणस्थळ: एम/एस् विक्रम मुद्रणालय,१०३ मेन रोड,कणकवली,जिल्हा सिंधुदुर्ग,महाराष्ट्र ४१६००२ .उपसंपादक-विक्रम कदम,कार्यकारी संपादक -प्रा.उज्वला राठोड, डॉ.शर्मिला कदम राजपूत.ई मेल कार्यालयीन पत्रव्यवहार व जाहिरातींसाठी **संपर्क**:**rupasamachar@gmail.com**,बातमी व फोटोंसाठी **संपर्क**:**sindhudurg.samachar@gmail.com** सिंधुदुर्ग -फोन ०२३६७-२३२१९२५, मुंबई,पुणे -९८२२९७९७३२, अरिहंत अपार्टमेंट फोन ०२३१- २५२३००५ मुंबई कार्यालय- सत्यवान बिल्डिंग,पडवळनगर ए ठाणे वेस्ट ४००६०४ .Whatsapp-9108766862

आठवणींच्या गोष्टी



राष्ट्रपाल सावंत,
चिपळूण- रत्नागिरी
मो. ९४०३१४४३५६..

# जनीकुमार कांबळे काव्य गीतातून जनजागृती करणारे कलावंत



कलावंताला जात धर्म पंथ नसतो तसं त्यांचं कुणी वय विचारत वा पाहत नाही आणि ते कळलं तर .. कमाल आहे बॉ यांची! काय तरुणाईच्या ईर्षेने जगतेय ही व्यक्ती ही भावना ऐकणाऱ्याच्या ,पाहणाऱ्याच्या मनात निर्माण होते. दोन वर्षापूर्वी अपरान्त साहित्य कला प्रबोधिनीची पहिली सम्यक साहित्य कला संगीती चिपळूण येथे मे २०२३मध्ये आयोजीत केली कोकणातील सर्व जिल्हातील लिहित्या हातांनी नी गात्या गळ्यांनी यात सहभाग घेतला. पहिल्या दिवशीचा गीत गायन कार्यक्रमात सिंधुदुर्ग जिल्हातील वैभववाडी तालुक्यातील कुसूर गावचे जनीकुमार कांबळे यांनी माझ्या समवेत गीत गायन सादर केले. त्यांचा आवाज,सादरीकरण, लेखणी सोबत वक्तृत्व ऐकून माझ्यासह सर्वजण बेहद्द खुश झाले.

अंजियोल्पस्टी सर्जरी सहित इतर किरकोळ ओपरेशने झालेले जनीकुमार कांबळे महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळातून वायरमन,लाईनमन, फोरमन पदावरून निवृत्त झाले असले तरी सामाजिक, धार्मिक, कला आणि प्रबोधन कार्यात ते आजमितीस सक्रिय आहेत.महामंडळात नोकरी, डोंगरदऱ्यातील धावपळीचा जीवन प्रवास, चार मुलांचं संगोपन, नातेवाईक,मित्रमंडळी यांना सहकार्य करण्यात हात आखडता घेतला नाहीच. १९८०पासून ते भारतीय बौद्ध महासभेच्या प्रसार,प्रचार कार्यात अंकुश पणदुरकर, व्हि. वाय आणि सूर्यकांत कांबळे यांच्या सोबत सक्रिय राहिले. डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या कुटुंबाशी ते एकनिष्ठ राहिले. आदरणीय मिराताई आंबेडकर यांच्या धम्म चळवळ कार्याचा त्यांच्यावर प्रभाव पडलाच. नरेंद्र दाभोळकरांच्या बरोबरीने अनिस चे कार्य केले. सोबत भाचा श्रीपत कांबळे कुसूरकर याची साथ मिळाली. गाणं त्यांच्या रक्तातच असल्याने त्याचा उपयोग धम्म प्रसार, समाज जागृतीसाठी केला. भीम गायन पार्टी कुसूर अशी गायन पार्टी निर्माण केली. शालेय जीवनात सावंत नावाचे गुरुजी होते त्यांच्या सह बाबू जाधव,शंकर , रत्नाकर, नारायण, मानकाजी आणि रामचंद्र या कांबळे बंधूच,आणि खऱ्या अर्थाने तत्कालिन मुंबईत राहणारे सोनू कसूरकर हे गायक होते त्यांची प्रेरणा मिळाली. सातवी पी. एस. सी होताच मुंबईत नोकरीसाठी गेले चुलत मामाकडे राहिले अडीच रुपये रोजाने नोकरी केली. शिक्षणं घेण्याची आवड असल्याने नाईट स्कूल मध्यें प्रवेश घेतला रजेच्या दिवशी गायक सोनू कुसूरकर कवी नाथा जाधव यांच्याकडे जायचे. त्याठिकाणी प्रल्हाद शिंदे, राजस जाधव, झुंजार सकपाळ, भिमानंद जाधव, गणेश तुळसावडेकर, यशवंत आजिवळेकर यायचे. मुंबई विठ्ठल उपम, नवनीत खरे शीला देवी, सायरा बेगम, रंजना शिंदे, प्रल्हाद शिंदे, गोविंदराव म्हशिलकर, अशा अनेक दिग्गज कलावंताचे कार्यक्रम समक्ष ऐकले. मुंबईत पहिला कव्वाली कार्यक्रम १९७४बांद्रा कॉलनीत नवनीत खरे, लक्ष्मण राजगुरू, जयंत जाधव यांच्या उपस्थितीत केला. नाथा जाधव, गिरिधर हसोळकर यांनी ऊत्तम संगीत साथ दिली. वामनदादा कर्डक यांच्यासह सर्वच कवींची गाणी गातागाता स्वतः गीत रचना करू लागले. पूर्वज तमासगीर होते. पूर्ण नावं दत्ताराम देऊ कांबळे आईचं नावं जनी या आईच्या नावावरून गौरीकुमार साळुंखे यांनी "जनीकुमार "नावं दिले याचं नावाने प्रसिद्ध हो म्हणाले. जनीकुमार यांची गीते अनेक नामवंतांनी गायली आहेत. इतर समाजातील भजन गाणारे त्यांची गीते गातात.

**"बहिऱ्या पुढं वाचून गाथा, कळणार त्याला काय रे**
**आंधळ्या म्होर इथे नाचून उपयोग काय रे"**
**"माता रमाबाई म्हणे सर्व बंधू भगिनींना**
**पती हाच माझ्या गळ्यातील दागिना"**
**"झूंजाया शिंग फुंकले, युद्ध जुंपले**
**कराया खुले तळे चवदार**
**तो नरवीर शुर झूंजार**
**माझा भिमराव आंबेडकर"**

जनीकुमार यांनी पोवाडा, लावणी, गोंधळी, गझल, बुद्ध, कबीर फुले, भीमाई, रमाई, सावित्रीमाई, आणि बाबासाहेबांच्या विचारांची हजारो गिते लिहिली आहेत. साधं सरळ, विनम्र आणि दुसऱ्याच भरभरून कौतुक करणारे व्यक्तिमत्व आहे. मी त्याचं नावं माझे मित्र कवी गायक संदीप यादव यांच्याकडून ऐकून होतो पणं भेट दोन वर्षापूर्वी झाली .

अपरान्त साहित्य कला प्रबोधिनीच्या ग्रूप वर मी शेयर करीत असलेलं माझ लेखन ते वाचत असतात. फोन करतात. त्यांना गरिबीची जाणं आहे. अनेक होतकरू विद्यार्थी , आपल्या आईवडिलांच्या कष्टाची, पत्नी वंदना यांच्या सहकार्याची , उच्चशिक्षित चार मुलांच्या प्रगती विषयी त्यांना जाणं नी अभिमान आहे. मुलगा देवेंद्र , मुली किर्ती , दिगंती, समता विवाहित असून सर्वजण शासकिय सेवेत आहेत, नातवंडे शिकत आहेत. भाचा श्रीपत पुतण्या सुहास मुलगा देवेंद्र यांना गायनाची आवड आहे. काही दिवसापूर्वी काकांना मी विचारलं सध्याचं जे कव्वाली, गायन पार्टी मधून प्रबोधन होतय याबाबत तुमचं मत काय ? काका हसले आणि म्हणाले दळणवळण साधन नसताना, पेट्रोमक्स, कंदील, मेणबत्ती उजेडात, एक ढोलकी, डफली घेऊन जे प्रबोधन होत होत आम्ही ते केलं तसं प्रबोधन सर्व प्रकारच्या सुख सुविधा असताना, भरगच्च संगीत, प्रवास साधन आणि भरपूर मानधन मिळतं असताना हल्लीं अपेक्षित प्रबोधन होतांना दिसतं नाही यांची खंत वाटते.

कधी कधी आयोजकही कलावंत यांना प्रबोधन गावू न देता केवळ मनोरंजन गा सांगतात त्याचं दुःख वाटतं . कलावंताची समाजानं दखल घ्यायला हवी कारण या कलावंतांनी खऱ्याअर्थाने समाज प्रबोधन स्वतः भूक तहान, कुटूंब विसरून वैचारिक चळवळ जपली आहे. तशीच या पुढे सुरु राहावी अशी सदिच्छा त्यांनी व्यक्त केली. काकांना अनेक मानसन्मान पुरस्कार मिळाले आहेत. विवीध संस्था मध्यें ते विविध पदांवर कार्यरत आहेत. मुंबईच्या सेंट्रल प्रकाशन यांनी आणि इतर प्रकाशकानी धार्मिक सामाजिक गीते , मधुर गीत कुंज, सुधार,धुरांधराचा प्रकाश, भीम गौरव गिते, भीम अमर गिते, लावणी पोवाडे लोकगीते, बुद्ध भीम गीते प्रकाशित केली आहेत.

जानेवारी २०२५ अठरा, एकोणवीस तारखेला महाड येथे तिसरी सम्यक साहित्य कला संगीती झाली. त्याठिकाणी हेतकर्स पब्लिकेशन यांनी त्यांची "गाऊ गाणी युगांधराची"हे १०१गीत असणारं पुस्तकं प्रकाशित केले आहे. कवी ज. वि. पवार यांनी प्रस्तावना लिहिली आहे. नाटककार प्रेमानंद गज्वी, प्रा आनंद देवडेकर, प्रा.संजय खैरे , प्रा सिद्धार्थ तांबे, लेखक सुनिल हेतकर, पत्रकार संदेश पवार, कवी मारूती सकपाळ अशी अनेक मान्यवर मंडळी उपस्थित होते या पुस्तकावर सविस्तरपणे लिहीन. मात्र महाड क्रांतीभूमीत या संगीतीत आंबेडकरी जलसा, गायन पार्टी गीते सादर करण्याची अनेकांसह जनीकुमार कांबळे यांनी जी अप्रतिम गिते सादर केली . सत्तरी नंतर व्यक्ती फार दगदग करत नाहीत पणं हाडाचा कलावंत नी कार्यकर्ता कधी स्वस्थ बसत नाही. जनीकुमार हे त्यातीलच एक आहेत. मी त्यांना आमच्यातील पंच्याहत्तरीतील सर्वात तरुण कलाकार म्हणतो. त्यांनी असच गात लिहितं राहून नवोदित यांना प्रेरणा द्यावी. हीच त्यांच्यासाठी मंगल कामना.



# मोंगा पार्टी

## मालवणी बोली



वयल्यांचा कवग्या,
मालवण- सिंधुदुर्ग.



परबीनीच्या मनात काय इला काय म्हायत, परवा आमच्याकडे इल्या इल्या तिना विषय काढल्यान, गावकारनी आपण बायकांची मोंगा पार्टी करुया उद्या. मोंगा पार्टी म्हणजे काय ता माका कळना. मी विचारलय, कसली मोंगा पार्टी? मी बाय असला नाव नाय कधी ऐकलय. मोंगा पार्टी कशी करतत ता सांग आधी.

तशी परबीन म्हणाली, अगे, मोंगा पार्टी म्हणजे पोपटी. मोंग्याक काय काय ठिकाणी पोपटी म्हणतत. गावठी पावटे, मके, बटाटे, कवटा, चिकन घ्यायचा, चिकनाक मीठ मसालो लावायचो आणि मोग्यात म्हणजे मातीच्या मडक्यात ठेवायचा. जमिनीत खड्डो करायचो, खड्ड्यात आग करायची नि त्या आगीर मडकी ठेवायची. अर्ध्या पाऊण तासात मस्त मोंगे शिजान तयार व्हतत. अगदीच काय नाय कळला तर मग यु ट्युबवर बघायचा. मोंगे कसे लावतत ते. आता नदीच्या काठार पावटे लय पिकवतत. अशा शेताच्या कडेन बघा, खोपी केल्यानीहत. मोंगा पार्टी, पोपटी पार्टी असे बोर्डय लावल्यानीहत. अगे, लय भारी चव लागता मोंग्याची. आपण करूयाच.

काल दोपारी आम्ही तीन चार घरच्या बायकांची मिळून मोंगा पार्टी करुचा येवजलव. पावटे, मके, चिकन, कवटा आणूक परबीनीकच बाजारात पाठवलय. परबीनीन चिकना आणल्यावर त्येका मस्त मीठ मसालो, चटणी लावन ठेवलव. सांचे आमच्याच खळ्यार मोंगा पार्टी करायची ठरला. तसो खळ्याच्या कडनीकच आमचो लाकडांचो माच आसा. थयचीच लाकडा घेवचा ठरला. धा-बारा बायका जमले. सगळ्यांनी आपल्याक जमतीत तशी कामा करुक सुरुवात केल्यानी. परबीनीन किती समजावून सांगल्यान तरी मोंग्याची रेसीपी काय आमच्या गळी उतरना. मग परबीनीनच तिच्या मोबायलात युट्यूबवर रेसीपीचो व्हिडीओ लावल्यान. मगे ती रेसिपी बघून बघून आम्ही तीन मोंगे शिजत ठेवलव.

मोंग्याक चव चांगली येवच्यासाठी तेच्यात भांगरुडाचो पालो टाकलव. भांगरुडाचो पाली टाकूचो लागता ता पण युट्यूबवरच्या सुगरणीकडूनच कळला. एका मडक्यात पावटे, तूर, मटकीचे शेंगे, मके, दुसऱ्या मडक्यात बटाटे, कवटा आणि तिसऱ्या मडक्यात चिकन असे तीन मोंगे लावले. साधारण पाऊण तासात मस्त सूगंध परमाराक लागलो. वासानच खात्री पटली की मोंगे मस्त होतहत.

आग विजवल्यावर, आगीर पाणी मारून मोंगे सावकाश भायर काढलव. मोंगे एकेका परातीत ओतलव तर खरोखरच मस्त पोपटी झाली व्हती. केळीची पाना वाढून सगळे बायका गोल धरून मोंगे खावक बसलव. अगे बायानु, काय सांगाची मोंग्याची चव! असा साधा सुधा जेवाण इतक्या चवदार व मस्त लागता ह्या आमका पहिल्यांदाच कळला. पावटे, तूर, मटार, मके इतके चविष्ट की विचारू नको! चिकन, कवटांची छमचव तर बाय अगदी अफलातून.

धा बारा बायका पोटभर जेवलव. जास्त भांडीकुंडी नको, तेल नको, गॅस नको, चंल नको, निसर्गाच्या सान्निध्यात असा रांधलला जेवाण छान चविष्ट लागता. त्येची सर त्या फाय स्टार हॉटेलातल्या जेवणाकय नाय ह्येची खात्री पटली. कधी नाय ता परबीनीन काय तरी चांगला नि सगळ्यांक आवडणारा सुचवल्यान ह्येचा



कौतुक वाटला. सगळ्या बायकांनीच परबीनीचा कौतुक केल्यानी. आता बघुचे तडे पावट्याचे मळे दिसतहत. तेव्हा मळ्यात जावा, पावट्याचे शेंग्ये आणा, चिकन, कवटा आणा, मके आणा आणि मस्त मोंगा पार्टी करा. भांगरुडाचो पालो काय कुणग्यांत असतलोच. मस्त मोंगे लावा, एन्जॉय करा नि रेसीपीची काय अडचण इली तर माका फोन करा. कसा?



दैनिक सिंधुदुर्ग समाचार




प्रजासत्ताक दिनाच्या हार्दिक शुभेच्छा

पांडुशेठ साटम

# पातळ भाजी...

## मालवणी बोली



**रीना पास्ते परब**
**पुणे**

"भाजी बरी इली गो मीना..." मीनाची कवळी लुसलुशीत लाल भाजी बगून वयनी लांमसूनच मीनाक बॉला होती. "फाल्या रोव काढतलंय, तुका दितय हाडून..." मीनान भाजी शिपता शिपता हुतला. वयनी वायच वगत मिनाचे गजालीक ऊबी रवान दुकानात गेली. चाय वांगडा खावक घोवाक बटर व्हये होते ते हाडुचे होते. यताना तीना पाव किलो मसूरदुकू हाडले.

वयनीन हाली सालाक भाजी पालो काय करूक नाय होतो. कोनी दिली भाजी तर ती आवडीनं करी. तिच्या पायाच्या दुकन्यान तिका सगळा सोडूक लायला. बाबडी दुकानात जावकदुकू काटी घेवन जाय. खय तरी धडपडाक जायत तर जाग्यार बसाचा लागात. घोवाक काय तरी सांगाचा तर तो याक हाडतलो तर दुसरा इसारतलो. वयनी बाबडी कदवाव दुकानात जाय नाय झपला तर पुतनयाक सांगा. आज मीनान भाजी दितलय हुतल्यार तिना फाल्याची तयारी केली. मसूर घालून रोवाची भाजी बरी जाता हुनत तिना थोडे मसूर वाडग्यात काडून ठेयले. बायकीचे फजावाच्या डब्यात घालुन ठेयले. राती फुगत घालूक याद जावं व्हयी हुनान तिना चुलीकडे वाडग्या ठेयला. सांज जायत इली तशी वयनी भायर यवन लोट्यार बसली. बाळू यवन तिचे गजालेक बसलो. आंदार पडलो काय बती लावन कायम ती वायच वगत लोट्यार बसा.



तिचो घो चार घरा घेवन जवक घरात येय. तवसर ती दोंपारचा असलला गरम करून ठेय. रातिक रानुच्या भानगडीत ती कदीच पडा नाय. घो इलो तसो जवन घेवन तिना भांडी घासली. चार भांडी आसली तरी ती सोमती घासुन टाकी. भांडी घासुन तिना मसूर फुगत घातले. फाल्या अवनूचा पयलाच रोवाचा सामारा करूचा यवजून ती निजाक गेली. वयनी सोबावान भोळी होती. तिका अवाटात कोन आडयो सबुद कदी बॉला नाय. काय तरी असलंला तिका वायच तरी हाडून देयत. मीनान उट्ठुकशिनी भाजी काडली. थोडे थोडे चार वाटे केल्यान. आपनाक व्हयी ती ठेवन शेजाराक दोगांक देवन ता वयनीच्या घरात इला.
"गे वयनी काय गे करत...? धर भाजी हाडलय..." मीना बोलत बोलत सूप घेवन घरात इला.
"ये गो मीना... धर चाय घे..." वयनीन मीनाक चाय दिली. मीनान हातीतली भाजी परातीत वतून चायचो पेलो घेतलो.

चाय खावन मीना सोमता घराक गेला. त्याका भाकरी भाजुचे होते. हडे वयनीन पेजयेक आदान ठेयलला. चुलीर कुंडला ठेवन ती भाजी सुटी करीत बसली. भाजी सुटी करून तिना पानयात टाकली. तवसर आदान बरा खळखळला. तामयोभर पानी बाजूक काडून तिना उकाळत्या पानयात वालयचे उकडे तांदूळ धुवन वतले. येकदा झारो मारून ती भाजी धुवक गेली. भाजी धुवन काडून गळत ठेवन तिना पेजयेच्या तोंडाक व्हयी ती सुक्या मिरशांगाची चटणी वाटली.परत यवन चुलीर बगलेन तर पेज शिजली. तसा तिना कुंडला उतरून खालते ठेयला. कुंडल्यार येळणी ठेवन परत तिना चुलीर भाताक टोप ठेयलो. भाताचा आदान तापता तवसर घोवाक गुळमात पेज वाढून केळीच्या खोल्यार चटणी दिली. आपनाक पेज घेवच्या आदी तांदूळ आसडून ठेयलेन पेज घेवन ती लोट्यार इली. हुनहुनीत पेज खावन तिका बरा वाटला. वायच बसात हुनजे आदान तापतला. बाबडी उठान तांदूळ घालूक गेली. भात जाता तवसर भाजी चिरुक ती बसली. भाजी चिरून टोपात वतून तिना भुतूर फुगत घातलंले मसूर धुवन घातलेन. भात बॉटशेपो जालो तसो तिना गाळून मुरत ठेयलो. बाजूचे चुलीत थोडे रसरशीत इंगळे टाकून तिना त्या चुलीर भात उतरून ठेयलो. भाजयेच्या टोपात पेलोभर पानी घालून ढाकान मारून भाजी शिजत घातली. भाजी शिजता हुनासर नाल फोडून खोबरा किसून ती लोसूण सोलूक बसली. फुगत घातलंले मसूर सोमते शिजले. भाजी तर काय उबेर शिजणारी होती. तिना टोप उतरून ठेवन तवो चुलीर ठेयलो. कांदो खोबरा भाजून काटया पाटी वडून ती पडयेत गेली. पाट्यार पानी वतून धुवन तिना खोबरा वाटला. खोबरा वाटून ती सामारा फोडणेक घालूक चुलीकडे इली.



लोसून करटेन ठेचून तिना टोप चुलीर ठेयलो. टोपात त्याल घालून वायच कानो परतून मसालो हळद घालुन भाजून घेवन तिना उकडलली भाजी वतली. वाटाप घातला. चरचरीत मसाल्याच्या वासान घर भरला. सामारा खतखदल्यार तिना पणती चुलीत घातली. पणती तापल्यार ती पकडीन भायर घेवन तिच्यात त्याल घातलेन. त्यालात लोसून बरो भाजलो तशी पणती तिना सामाऱ्यात सोडली. सोमता वरते ढाकान मारून तिना चुरचुरीत फोडणी दिली. मटनाक पाटी काडीत असा सामारा करून तिना उतरला.

बागात जावन घो इलो त्याका वासानच भूक लागली. वयनीन बेगनाच घोवाक जवक घातला. घोवाचा जवन जाला तशी वयनी जवक बसली. पयलो घास घेतल्यार तिका आवशीची आठव इली. आवशीक असा सामारा आवडा. आवस मरान इतकी वर्सा जाली तरी दुकू आवशीची याद इल्याखेरीज वयनीचो दिस जाय नाय. वयनी पॉटभर जयली. भरलंल्या पॉटार तिना जावन येक सवाशीन सांगली. तशी मायेराक तिची भावजय घोटी भरी. तरी आज आवशीच्या नावान घोटी भरूचा तिच्या मनात इला.

वयनीन आवशीक आवाडता ता रानुचा येवजून घराची वाट धरली. यवन भाणी खळवटून ती पाटल्यादारा गेली. आवशीच्या नावान काय तरी देव व्हया ह्यो इचार आता तिच्या डोक्यात होतो...



## परीक्षा काळात विद्यार्थ्यांनी कसे असावे?

1. शांत आणि आत्मविश्वासपूर्ण रहा:
   - परीक्षा सुरू होण्यापूर्वी मनात सकारात्मक विचार ठेवा.
   - "मी तयारी केलेली आहे, मला येतंय!" असा विश्वास ठेवा.
2. योग्य वेळेचे नियोजन करा:
   - परीक्षा हॉलमध्ये वेळेआधी पोहोचा, त्यामुळे गडबड होणार नाही.
   - प्रश्नपत्रिका वाचायला आणि उत्तरं लिहायला वेळ योग्य पद्धतीने वाटून घ्या.
3. ताण दूर ठेवा:
   - परीक्षा ताण घेऊन काहीच साध्य होत नाही. काही क्षण डोळे मिटून दीर्घ श्वास घ्या आणि मन शांत ठेवा.
   - फक्त प्रश्नपत्रिकेवर लक्ष केंद्रित करा, इतर गोष्टींचा विचार टाळा.
4. प्रश्न नीट वाचा:
   - प्रत्येक प्रश्न नीट समजून घ्या. घाईगडबडीत चुकीचं उत्तर लिहिण्याची शक्यता टाळा.
5. आधी सोपे प्रश्न सोडवा:
   - जे प्रश्न तुम्हाला अगदी सहज सोडवता येतील, ते आधी सोडवा. यामुळे आत्मविश्वास वाढतो आणि वेळही वाचतो.
6. स्वतःला प्रोत्साहित करा:
   - प्रत्येक उत्तर पूर्ण केल्यानंतर स्वतःला मनात "चांगलं केलं!" असं म्हणा. यामुळे पुढचे प्रश्न सोडवण्याची उर्जा वाढते.
7. विराम आणि पाणी प्या:
   - थोडा वेळ डोळे मोकळे करून पुढचं उत्तर लिहा.
   - थोडं पाणी प्यायल्याने मेंदू सतर्क राहतो.
8. शेवटी उत्तर पत्रिका तपासा:
   - वेळ उरला असल्यास, दिलेली उत्तरं तपासा. कुठे काही राहिलंय का हे लक्षात घ्या.
9. नकारात्मक विचारांना दूर ठेवा:
   - "मला हे जमत नाही," असा विचार करू नका. जे येतंय ते लिहा.
   - तुमची मेहनत नेहमीच यशस्वी ठरते, यावर विश्वास ठेवा.
10. मुस्कान ठेवा आणि आनंदी रहा:
   - परीक्षेला फक्त एक प्रक्रिया म्हणून पहा, आयुष्याचा अंतिम टप्पा नव्हे.
   - हसतमुख राहा, कारण आनंदी मनाने केलेलं काम नेहमीच यशस्वी होतं!

सर्व विद्यार्थी मित्र-मैत्रिणींना परीक्षेसाठी शुभेच्छा! 😊✨



## मटण कबाब रेसिपी



स्वाती पाटील
पलूस ,सांगली

**आज आपण मटण कबाब रेसिपी ही एक चविष्ट डिश आहे जी स्नॅक्स किंवा स्टार्टर म्हणून खाल्ली जाते. अशा या कबाबची रेसिपी सोपी आहे. चला, तयार करूया.**

**साहित्य :**

- मटण खिमा - 500 ग्रॅम
- कांदा - 2 मध्यम, बारीक चिरलेले
- कोथिंबीर - 1/2 कप, बारीक चिरलेली
- पुदिन्याची पानं - 1/4 कप, बारीक चिरलेली
- आलं-लसूण पेस्ट - 2 चमचे
- हिरवी मिरची - 3-4, बारीक चिरलेली
- गरम मसाला - 1 चमचा
- धनेपूड - 1 चमचा
- जिरेपूड - 1 चमचा
- लाल तिखट - 1 चमचा
- चाट मसाला - 1 चमचा
- बेसन (चण्याचे पीठ) - 2-3 चमचे
- लिंबाचा रस - 1 चमचा
- मीठ - चवीनुसार
- तेल - तळण्यासाठी
- तंदुरी कलर (ऐच्छिक) - चिमूटभर

**कृती:**

1. मटण खिमा स्वच्छ धुवून, पाणी काढून टाका. तो कोरडा होईपर्यंत थोडा वेळ ठेवा.
2. एका मोठ्या भांड्यात मटण खिमा घ्या. त्यामध्ये बारीक चिरलेला कांदा, कोथिंबीर, पुदिन्याची पानं, आलं-लसूण पेस्ट, हिरवी मिरची घाला.
3. मिश्रणात गरम मसाला, धनेपूड, जिरेपूड, लाल तिखट, चाट मसाला, आणि मीठ घालून व्यवस्थित मिक्स करा.
4. मिश्रणाला घट्टपणा आणण्यासाठी बेसन घाला. लिंबाचा रस घालून चांगले मिसळा. ऐच्छिक असल्यास तंदुरी कलर घालून मिसळा.
5. हे मिश्रण 30 मिनिटांसाठी झाकून ठेवा, जेणेकरून मसाले खिमा मटणात चांगले मुरतील.
6. मटणाच्या मिश्रणाचे छोटे-छोटे गोळे तयार करा आणि त्यांना कबाबच्या आकारात दाबून घ्या. तुम्ही शिख किंवा कटलेटच्या आकारात कबाब बनवू शकता.
7. एका कढईत तेल गरम करा. तेल पुरेसं गरम झाल्यावर कबाब तळायला टाका. मध्यम आचेवर दोन्ही बाजूंनी सोनेरी आणि खमंग होईपर्यंत तळा.
8. गरमागरम मटण कबाब ताटात काढा. त्यावर थोडासा चाट मसाला शिंपा. पुदिन्याच्या चटणी, कांद्याच्या रिंग्स, आणि लिंबाच्या फोडीसोबत सर्व्ह करा.

**टीप:**

- ग्रील्ड कबाबसाठी: तव्यावर किंवा ग्रील पॅनमध्ये थोडं तेल लावून कबाब ग्रील करू शकता.
- स्मोक फ्लेवर: कोळशाचा एक छोटा तुकडा जाळून गरम कोळशावर थोडं तूप ठेवा आणि त्याचा धूर कबाबमध्ये मुरवा.
- मटण चांगले मऊ होण्यासाठी खिम्याला हलकं दही घालून मिक्स करू शकता.

1. **तुमच्या मटण कबाबचा आस्वाद घ्या आणि कुटुंबासोबत शेअर करा! 😊 कुटुंबाला आणि मित्रांना खूश करा!**

# 'आपला प्रजासत्ताक दिन'



श्री. धनंजय शेटये
गोळवण.



भल्या पहाटे कडक थंडीच्या दिवसात प्रत्येक वर्षी जानेवारी महिन्याच्या २६ जानेवारीला अगदी बालपणापासून आपण 'प्रजासत्ताक दिन' साजरा करत आलो आहोत. अगदी आपल्या आत्मियतेने जपलेल्या देशभक्ती,देशप्रेमाची जाणीव जागृत करणा-या सार्वजनिक उत्सवाचे स्वरुप देत शाळेत, सोसायटीमध्ये,नोकरी- धंद्याच्या कामकाजाच्या कार्यालयात साजरा करत आहोत.प्रजासत्ताक दिन हा सर्वधर्मसमभाव शिकवणारा आपापसातील जिव्हाळा दर्शविणारा आपल्या हक्काना जबाबदारीची जाणीव करून देणारा एक सार्वत्रिक सोहळाच असतो.शालेय जीवनात देशभक्तीपर गाणी म्हणत, छोटेखानी भाषण देत प्रजासत्ताक दिनाचे महत्त्व समजून घेत आहोत.या पवित्र दिवशी अनेक सोसायटीमध्ये सालाबादप्रमाणे वार्षिक सार्वजनिक श्रीसत्यनारायण महापुजेचं आयोजन केले जाते.विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येते.

स्वतंत्र भारताची सार्वभौम लोकशाही प्रजासत्ताक आहे. जनतेचं राज्य जनतेच्या हक्क आणि कर्तव्यांची जाणीव करून देणारा दिवस.अगदी लहानपणापासून शालेय प्रजासत्ताक दिन आपण प्रत्येकाने साजरा करत आपल्या शैक्षणिक जीवनाची वाटचाल करीत आलो आहोत.'प्रजासत्ताक' होण्यासाठी कितीतरी भव्यदिव्य पार पाडावी लागली आहेत. देशाला ब्रिटिशांच्या तावडीतून मुक्त करण्यासाठी अनेक शूरवीरांच्या प्राणांची आहुती द्यावी लागली होती. कित्येक मातांनी आपले वीरपुत्र भारतमातेच्या उद्धारासाठी देशाला अर्पण केले होते.आज आपण सुवर्णमयी स्वातंत्र्याचे दिवस अनुभवत आहोत. हक्कासाठी भांडत आहोत. आपल्याला आपल्या जबाबदारीची सुद्धा जाणीव असली पाहिजे आपण स्वतंत्र भारताचे नागरिक आहोत तर आपल्या देशासाठी आपण आपली काही कर्तव्ये आहेत ती योग्य रित्या पार पाडली पाहिजेत.भारतीय प्रजासत्ताकदिवस हा भारताच्या प्रजासत्ताकात दरवर्षी २६ जानेवारी रोजी पाळला जाणारा राष्ट्रीय दिन आहे.याला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारताचे संविधान संविधान समितीने २६ नोव्हेंबर, इ.स. १९४९ रोजी स्वीकारले व २६ जानेवारी इ.स. १९५० रोजी पासून भारतीय संविधान अंमलात आले. जवाहरलाल नेहरू यांनी ३१ डिसेंबर, इ.स. १९२९ रोजी लाहोरजवळ रावी नदीच्या काठी अशोक चक्रांकित तिरंगा ध्वज फडकावून पूर्ण प्रजासत्ताकाची (स्वातंत्र्याची) घोषणा केली होती.त्याची आठवण म्हणून २६ जानेवारी हा दिवस राज्यघटना अंमलात आणण्यासाठी निवडण्यात आला.

या दिवशी देशभरात भारताच्या राष्ट्रध्वजाचे आरोहण होऊन त्याला वंदना दिली जाते.भारताचे राष्ट्रगीत म्हणले जाते आणि आदर व्यक्त केला जातो. हा दिवस आपल्या देशातील सुवर्ण दिन आहे. या दिवसाची प्राप्ती हजारो देशभक्तांच्या बलिदानातून झाली होती. या दिवशी शाळा महाविद्यालयांमध्ये भाषणाचे कार्यक्रम आयोजित केले जाते. प्रजासत्ताक दिनाच्या दिवशी अगदी सकाळपासूनच सगळीकडे महेंद्र कपूर,लता मंगेशकर, मोहम्मद रफी यांची देशभक्तीपर अजरामर गीत वाजत असतात. प्रत्येक भारतवासीयांच्या मनात आपुलकीचे, जिव्हाळ्याचे अतुट नाते प्रजासत्ताक सोहळ्याशी जोडलेले असते. देशप्रेम कोणाला कधी शिकवता येत नाही. तर देशप्रेम, देशभक्ती हे आपसूकच आपल्या मनावर बिंबवले जाते. देशभक्ती, देशप्रेम ही आपली आंतरिक स्वयंप्रेरणा असते.आपल्या देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान करणा-या महान हुतात्म्यांच्या बलिदानाची आहुती आपल्यामध्ये कृतज्ञची भावना उद्युक्त करत असतात.आजकालच्या आपल्या नव्या पिढीला 'रिलच्या' युगातुन 'रियल हिरोंचे' बलिदान,त्यांचे त्याग यांचे आठवणींच्या झरोक्यातून प्रजासत्ताक दिनाच्या निमित्ताने मनावर बिंबवले जाते. '

आपला' देश न म्हणता 'माझा' भारत देश अशी आपुलकीची भावना निर्माण व्हायला हवी तरच आपण आपल्या देशाची काळजी घेणार.ज्यावेळी आपण 'आपला' असे म्हणतो तेव्हा आपण इतरही कोणतरी आपल्या देशाची काळजी घेईल असा विचार करीत असतो पण ज्यावेळी 'माझा देश' असं म्हणतो तेव्हा 'माझा देश' मलाच काळजी घ्यायला हवी ही जाणीव सातत्याने निर्माण होत असते. 'आपली सोसायटी' आणि ' माझे घर' माझे घर यामध्ये फरक आहे ना? 'माझं घर' म्हटल्यानंतर आपण विशेष काळजी घेतो. आपल्या घरात कचरा इकडे तिकडे फेकणार नाही म्हणूनच 'आपला' एवजी ' माझा भारत देश' असे गर्वाने आणि अभिमानाने म्हणूया.

**आपण आपल्या देशासाठी आपल्या भारत देशाचा प्रजासत्ताक चिरायू होवो.**

# काव्यांगण



## छकुली लेक माझी .....

छकुली,लेक माझी
आज आली माहेरा
झाला आनंद साऱ्या घरां
आईच्या कुशीत विसावूनी
वाहल्या आनंदाच्या अश्रुधारा

तिला पाहता
पिवळे हिरवे शेणाचे अंगण
तिच्यासोबत नाचू लागले
तुळशी वृंदावनही पाहुनी तिला
आनंदानी डोलू लागले

तिला पहाता
गोठ्यातली गाय कपिला
लागली आनंदानी हंबराया
पाहुनी आज तिला
प्राजक्ताही जास्तच बहरला

आज तिला पाहुनी
साऱ्या सई झाल्या गोळा
सारी रात जागून काढली
झिम्मा फुगडीचा खेळ रंगला

निरोपाची वेळ आली
छकुली चालली सासरां
ठेवुनी मागे
सुखद आठवणी साऱ्या

वाट धरता सासरची
हुंदका दाटून येतो
आई बाबांचा प्राण
आता कंठाशी येतो

**प्रा.के.एस.शिरबंदे,**
**दापोली**



## भारतीय प्रजासत्ताक दिन

सव्वीस जानेवारी -२
हा दिवस लय भारी - २
या दिवसाची महती - २
काय सांगू तुम्हां किती ! - २
हा दिवस लय भारी - २ ॥धृ॥

झाला भारत स्वतंत्र - २
हा दिवस गणतंत्र - २
या दिवशी गणराज्याची - २
स्थापना देशात झाली ! - २
हा दिवस लय भारी - २ ॥१॥

या दिवशी संविधानाची - २
घोषणा देशात झाली - २
या दिवशी भारताची - २
घटना अंमलात आली ! - २
हा दिवस लय भारी - २ ॥२॥

**राज भिंगारे,**
**रत्नागिरी**

## बालिका

माझी मुलगी
करते सलगी
सांगू तुम्हा काय ?
बनते माझी माय

आहे लई निर्भिड
स्वत:ची आवड
सदा माझ्यावर थोपते
प्रसंगी कुशीत झोपते

सकळांना आवडावी
अशी साडी निवडावी
पध्दतशीर ती नेसावी
आई तिची छान दिसावी

देते फुकटचा सल्ला
गळसर तोडा छल्ला
निवडते मोजके दागिने
करवते नाश्ता मॅगीने


जाते घेऊन फिरायला
फुरसत देत नाही मरायला
न कंटाळा, क्रोध वा कोप
हसते हसवते मला मोप

माझ्या या चंद्रकोरीला,
काय म्हणावं या पोरीला ?

**डॉ. प्रेमा मेणशी,**
**बेळगावी- कर्नाटक**

## माझी मुलगी

पहाट होवून उगवते
माझी मुलगी
स्वप्नवत मधाळ हसते
माझी मुलगी
फुलाफुलांतून बहरते
माझी मुलगी
गार वाऱ्याची झुळूक होते
माझी मुलगी
विराणी होवून काळजात उतरते
माझी मुलगी
निघतांना परदेशी पावलात अडखळते
माझी मुलगी
एअरपोर्टवर मला बिलगते
माझी मुलगी
म्हातारपणात हक्काचं माहेर होते
माझी मुलगी.
चांदण्याचे गोड गारुड
माझी मुलगी
गाभुळ चिंचेचे बुटूक
माझी मुलगी
सखी,सोबती प्रेमळ
माझी मुलगी
शीतल मनकळी कोवळी
माझी मुलगी
अशी आहे जगावेगळी
माझी मुलगी.



**स्नेहा राणे-बेहेरे,**
**मुंबई**

## काफिया

सखे तुझ्यासम हवा काफिया ह्या गजलेला
हुरहुरण्याने जीव लावला ह्या गजलेला

शब्दांनाही बहर विखारी आल्यानंतर
कुणी शिकवला छंदछबीला ह्या गजलेला ?

पुन्हा नव्याने होऊ दे बरसात सुखाची
डोळ्यांमधला थेंब म्हणाला ह्या गजलेला

प्राण ओतला तेंव्हा मोठा गहजब झाला
तुझा साजणे सुगंध आला ह्या गजलेला

मिसऱ्यामधला एक काफिया विनवत होता
बाळ निरागस दे ना देवा ह्या गजलेला

सोडुन गेला जरी अवलिया गाव गजलचे
बिलगुन रडला शब्द बापुडा ह्या गजलेला

**सुदेश मालवणकर,**
**दापोली**

## स्मरण क्रांतिवीरांचे !

जे लढले होते तेव्हा
आज ते अस्तित्वात नाहीत,
आहेत जे आज ईथे त्यांना
स्वातंत्र्याचे मोलच नाही

दु:खाची झळ सोसली त्यांनी
भविष्याची पर्वा केली नाही,
सुख आज आम्ही उपभोगतोय
आम्हाला त्यांची कदर नाही...

स्वप्न त्यांच्या डोळ्यातले
पारतंत्र्यात कधी साकारले नाही,
त्यांच्या स्वप्नांचे मूल्य
आम्हाला आज कळणार नाही

रक्त सांडले, फास स्वीकारला
जखमांना कधी कुरवाळले नाही,
ध्यास एकची स्वातंत्र्याचा
मोहाचा स्पर्श होऊ दिलाच नाही...

हसत हसत लढत राहिले
वंदे मातरम् बोलण्यास विसरले नाही,
मृत्यु समोर उभा असतानाही
माघार त्यांना मान्यच नाही

देशाला केले मुक्त जोखडातून
छळाला त्यांनी जुमानले नाही,
लढले ते वीर क्रांतिकारक
स्वातंत्र्याची फळे त्यांनी चाखलीच नाही...

गणतंत्र दिनाच्या या पवित्र क्षणी
त्यांना न स्मरून चालणारच नाही
ते लढले म्हणून आज आहोत आपण
त्यागाविना त्यांच्या आपले अस्तित्वच नाही

ज्योती रावराणे, कांजूरमार्ग, मुंबई






## मराठी भाषेचे महत्त्व

**मराठी आहे अमुची मायबोली**
**गर्वाने बोलतो आम्ही मराठी!**

आपल्या मराठी भाषेला तब्बल तीन हजारांहून अधिक वर्षांचा इतिहास लाभला आहे. 'ज्ञानदेवे रचिला पाया!' अशी देखील आपल्या मराठी भाषेची ओळख आहे. इतक्या प्राचीन काळापासून प्रचलीत असलेल्या मराठी भाषेचा अभ्यास व संशोधन करून आता आपल्या मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा प्राप्त झाला आहे. मध्यंतरीच्या काळात आपल्या भाषेवर म्हणण्यापेक्षा आपल्या प्रांतावरच विविध परकीय आक्रमणे आली आणि त्यांनी आपली भाषा, आपली मराठी संस्कृती नष्ट करण्याचा प्रयत्न केला. अगदी आपली मराठी नामशेष करण्याचाही प्रयत्न झाला. मात्र आपले सुदैव किंवा आपले भाग्य इतके की, इतकी परकीय आक्रमणे सोसून देखील आपली मराठी टिकून राहिली, आपली मराठी संस्कृती टिकून राहिली.

आजच्या काळात जग एका विशिष्ट भाषेभवती एकवटले आहे. आजच्या काळात जगाचे सर्वाधिक व्यवहार इंग्रजी भाषेत चालतात. अगदी दिनदर्शिकेपासून ते विविध स्पर्धा परीक्षांसाठी इंग्रजी भाषेचाच वापर सर्वाधिक होतो. मात्र आपण हे लक्षात ठेवावयास हवे की, जन्मानंतर आपण पहिल्यांदा बोलायला शिकतो ती आपली मातृभाषा मराठीच असते. इथे दापोली परिसरात वाढताना आपण संगमेश्वरीसारखी बोलीभाषा बोलावयास शिकत असलो तरी ती मराठीच आहे हे विसरता कामा नये. आपण जन्मतःच जी भाषा बोलतो, त्याच भाषेचा आपणावर आयुष्यभर पगडा राहतो हे आपण लक्षातठेवावयास हवे. आधुनिकतेच्या नावाखाली आपल्या मराठी भाषेला निम्न मानून इंग्रजीसारख्या परकीय भाषेचा स्वीकार करण्याची किंवा अंगीकार करण्याची जीवघेणी स्पर्धा गेल्या काही वर्षांपासून सुरु झाली आहे. जगाच्या स्पर्धेत टिकून रहावयाचे असेल तर आपला मुलगा किंवा आपली मुलगी फाडफाड इंग्रजी बोलावयास हवी हा आजच्या प्रत्येक पालकाचा हट्ट आहे. मात्र या लोकांना हे माहित नाही की, कोणीही मनुष्य आपल्या मातृभाषेत जेवढ्या सुलभपणे व्यक्त होऊ शकतो तेवढा परकीय भाषेमध्ये व्यक्त होऊ शकत नाही. जे आपल्या मनात आहे, जे आपल्याला सांगावयाचे आहे, जे आपल्याला व्यक्त व्हावयाचे आहे, ते व्यक्त होण्यासाठी मातृभाषेऐवजी दुसरी कोणती भाषा असूच शकत नाही असा निष्कर्ष अनेक विचारवंतांनी काढला आहे.

जगातील तब्बल एकोणवीस भाषांवर प्रभुत्व असलेल्या तथाकथित जागतिक पंडिताचे गर्वहरण सम्राट अकबराच्या दरबारातील नवरत्नांपैकी एक असलेल्या बिरबलाने कसे केले आणि त्याची मातृभाषा कशी सर्वांसमोर आणली हे सर्वश्रुत आहे. त्यामुळेच आज आपण आपली मातृभाषा मराठी जपण्याची, जतन करण्याची व ती संवर्धीत करण्याची खरी गरज आहे. आपणच जर या मराठी भाषेपासून दूर गेलो तर पुढे कालांतराने आपल्या मराठीचे आणि पर्यायाने आपलेच फार मोठे नुकसान होणार आहे. आपली मराठी आता अधिकृत अभिजात झाली असली तरी ही केवळ औपचारिकता आहे, आपली मराठी भाषा ही आधीपासूनच अभिजात होती हे आपण जगाला ठासून सांगावयास हवे. त्यासाठी आपल्या दैनंदिन जीवनात, अभ्यासात मराठीचा अंगीकार करावयास हवा. इंग्रजी भाषेला वाघिणीचे दूध म्हणतात खरे, पण इंग्रजीसारख्या परकीय भाषांचा बुडबुडा लवकरच फुटणार आहे हे वास्तविक भाकीत आहे. शेवटी आपल्या काळजातली, हृदयातली आणि ओठांवर पटकन येणारी मराठी भाषाच टिकणार आहे हे सांगण्यासाठी कोणा भविष्यवेत्त्याची गरज नाही. आता आपणा प्रत्येक मराठी माणसाचे पहिले कर्तव्य हे आहे की, आपल्या शिक्षणासाठी, शिक्षणाच्या माध्यमासाठी, आपल्या भविष्यासाठी, भविष्यातील कारकिर्दीसाठी आपली अभिजात मराठी हाच पर्याय प्रत्येक मराठी माणसाने निवडावयास हवा. प्रत्येक माणसाने म्हणण्यापेक्षा त्याची सुरुवात प्रत्येक मराठी माणसाने स्वतःपासून करावयास हवी. आपल्या मराठीचा, मराठी भाषेचा डंका सर्वदूर पिटवायचा असेल तर आपण सर्वांनी आजच, अगदी आतापासूनच ठाम निश्चय करुया,

**माझ्या मराठीचा झेंडा**
**पार अटकेच्या नेऊ**
**माझ्या माय मराठीला**
**आता समृद्ध बनवू!**




**कु. प्रसाद नरेश शिगवण**
**शाळा- चंद्रनगर,**
**इयत्ता- सातवी.**



## वाचन संस्कृती आणि वाचनालये

**वाचू आनंदे जगू आनंदे**
**वाचू आनंदे राहू आनंदे!**

काही वर्षांपुर्वी आम्हा मराठी माणसांची जगण्याची हीच तर रीत होती. पुर्वी प्रत्येक शाळेतील, गावातील वाचनालये समृद्ध होती. वाचनालयातील पुस्तकांच्या भांडाराने तर ती समृद्ध होतीच, पण दिवसभरात शे दीडशे वाचक त्या वाचनालयात येऊन बसत होते, आवडीचे काही वाचत होते, घरी वाचण्यासाठी एखादे पुस्तक घेऊन जात होते यांमुळे ती वाचनालये समृद्ध होती. एका अर्थाने ही वाचनालये म्हणजे आपली संस्कार केंद्रे होती किंवा वाचन संस्कृती वाढविणारी केंद्रे होती असेच म्हणावे लागेल. अन्न, वस्त्र, निवारा, शिक्षण या त्या काळातील मुलभूत गरजा होत्याच, पण दैनंदिन वाचन ही देखील तेव्हाची मुलभूत गरज होती असे म्हटले तरी चुकीचे ठरणार नाही. घरातले, कार्यलयातले दूरध्वनी आणि दूरचित्रवाणी सोडले तर तेव्हा आताच्या सारखे मोबाईल फोन, इंटरनेट वगैरे नव्हतेच. दूरचित्रवाणीच्या बाबतीतही तेव्हा दूरदर्शन हेच एकमेव साधन होते. त्यामुळे दूरदर्शनवरील सकाळच्या व सायंकाळच्या बातम्या, रात्रीचे सह्याद्री वाहिनीवरचे कार्यक्रम, शनिवार व रविवारचे चित्रपट, क्रिकेट मॅच वगैरे सोडले तर तसे दिवसभरात त्यातच गुंतून राहण्यासारखे काही आकर्षण नव्हते. त्यामुळेच गावातले अनेक जण दररोज वाचनालयात हजेरी लावीत असत. वाचनालयातली दैनिके, नियतकालिके, दिवाळी अंक चाळून चाळून वाचीत असत. एखादे आवडीचे पुस्तक वाचण्यासाठी घरी घेऊन जात असत. मोबाईल फोन, इंटरनेट, कम्प्युटर, लॅपटॉप वगैरेंचा लवलेशही नसलेल्या त्या काळात वाचनालयांमध्ये लोकांची दररोज वर्दळ असायची. प्रत्येक घरातले आजी आजोबा दररोज नातवंडांना पुस्तकातल्या काही गोष्टी वाचून दाखवायचे. मुलांना पुस्तके वाचावयास लावायचे. एखाद्या धार्मिक पुस्तकातले श्लोक, ओव्या पाठ करावयास लावायचे. प्रत्येक घरातले आजी आजोबा त्यांच्या मुला नातवंडांना दररोज अशी वाचनाची सवय लावायचे. मग ती मुले इतरांना पुस्तके वाचायला भाग पाडायची. अशा प्रकारे आपली वाचन संस्कृती त्या काळात चांगलीच फोफावली होती.

कालांतराने दूरचित्रवाणीवर दैनिक मालिकांचे पेव सुरु झाले. आपल्याच अवती भवती असे काही घडते आहे, घडले आहे असे भासविणाऱ्या मालिकांकडे आम्ही आकर्षित झालो. हातातली कामे, पुस्तके टाकून त्या 'इडियट बॉक्स ' समोर तासनतास बसून राहू लागलो आणि मला वाटते, तेव्हापासून आपण वाचनापेसून दूर जाऊ लागलो. पुढे पुढे तर इंटरनेट, कम्प्युटर, मोबाईल फोन आले आणि आमच्या वाचनाचा पुरा विचका झाला. ही सारी अद्ययावत माध्यमे वापरता वापरता आम्ही पुस्तकांपासून, वाचनालयांपासून दूर गेलो. वाचनालयांना पारखे झालो. आधी दररोज वाचनालयाकडे सरावलेली आमची पावले आता तिकडे फिरकेनाशी झाली. दिवसभर वाचकांनी भरलेली, माणसांना सरावलेली वाचनालये आता वाचकांविना ओकीबोकी भासू लागली. पुढे पुढे तर ती अगदी निर्जन, ओसाड, रखरखीत दिसू लागली. हे सारे घडले कशामुळे?

पुस्तकांपासून, वाचनापासून दूर गेलेली माणसे पुढे आपली संस्कृती विसरून गेली. आपले संस्कार विसरून गेली. इतकेच काय, पण माणुसकी, माणूसपणही विसरून गेली. पुस्तकांपासून दूर गेलेला माणूस हा माणसात राहत नाही. तो सैतान बनतो. तो दानव बनतो. तो त्याची सदसद्विवेक बुद्धी विसरून जातो. तो समाजासाठी कंटक बनतो. आपल्या संस्कृतीस दुरावलेला, दूर गेलेला, विन्मुख झालेला माणूस कसा वागतो, त्याच्या हातून काय काय आणि किती भयंकर गोष्टी घडू शकतात हे आपण गेल्या काही वर्षांपासून सातत्याने पाहत आहोत. आज माणसातले माणूसपण हरवले आहे. माणूस माणसापासून दूर गेला आहे हे सकस किंवा निकोप समाजाचे लक्षण नाही. माणसाला परत माणसात यायचे असेल, माणसासारखे वागायचे असेल तर त्याने परत वाचनाकडे वळायला हवे असे मला या निमित्ताने सांगावेसे वाटते. त्यासाठी गावागावातल्या वाचनालयांकडे जाणारी पायवाट परत सुरु व्हायला हवी. वाचकांची पावले तिकडे वळायला हवीत. त्यांची वहिवाट सुरु व्हायला हवी. वाचनालयातल्या कपाटांवरची जळमटे दूर व्हायला हवीत. पुस्तकांवरची धूळ दूर व्हायला हवी. वाचनालये परत माणसांनी, वाचकांनी ओसंडून जायला हवीत. आताच्या माणसांनी मनात आणले तर हे सहज शक्य आहे. अजूनही वेळ गेलेली नाही. आपली संस्कृती, वाचन संस्कृती परत नव्याने समृद्ध व्हावी असे वाटत असेल तर मात्र हे सारे परत घडायलाच हवे. ज्या दिवशी लोक परत वाचनालयाची वाट धरतील, वाचनास सुरुवात करतील, वाचनात वेळ घालवतील तो दिवस आणि मग पुढचे सारे दिवस तसेच येवोत आणि आपल्या वाचन संस्कृतीला, वाचनालयांना परत चांगले दिवस येवोत ही किमान माझी तरी आंतरिक ओढ व तळमळ आहे.

**कु. अथर्व सुनील रांगले,**
**शाळा- चंद्रनगर,**
**इयत्ता- सातवी.**

